शुक्रवार, 14 ऑक्टोबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 69
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 14 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-69 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5


# वादळ निर्माण करणारे लोक माझ्या सोबत

## छगन भुजबळांच्या अमृत महोत्सवी सोहळ्यात उद्धव ठाकरे यांचे खुमासदार भाषण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : भुजबळ शिवसेनेतून जाताना एकटे गेले पण आता अख्खी राष्ट्रवादीला मदतीला घेऊन आले. सोबतीला काँग्रेस पण आहे. वादळ निर्माण करणारे लोक माझ्या सोबत आहेत. वादळ असो वा पाऊस न डगमगता उभे राहणार पवारसाहेब सोबत आहेत. तुम्ही सगळे माझ्या सोबत आहेत म्हटल्यावर मला चिंता नाही, असे प्रतिपादन उद्धव ठाकरेंनी केले. जेष्ठ नेते छगन भुजबळांच्या अमृत महोत्सवी सोहळ्यात ते बोलत होते.**



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, जम्मू अँड काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष डॉ. फारुख अब्दुल्ला, विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, लेखक-कवी डॉ. जावेद अख्तर, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित आहेत. ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आज वयाची पंच्याहत्तरी पार केली. त्यांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यानिमित्त सर्वपक्षीय नेतेमंडळींनी उपस्थिती लावली. या कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांनी खुमासदार भाषण केले. शिवसेनेची स्थापना, भुजबळ-बाळासाहेबांचे नाते, ठाकरे कुटुंबासोबत असलेला भुजबळ कुटुंबियांचा स्नेह, त्यानंतर भुजबळांनी घेतलेली बंडाची भूमिका आणि त्यानंतर २८ वर्षांनी महाविकास आघाडीची झालेली स्थापना अशा विविध मुद्द्यांवर उद्धव ठाकरे यांनी भाष्य करताना भुजबळांचे महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित केले. यावेळी अजितदादांच्या भुजबळांवरील फटकेबाजीलाही ठाकरेंनी उत्तर दिले, ज्यानंतर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला तर पुढील काही वेळ शिट्ट्याच थांबल्या नाहीत. अजितदादांच्या भाषणानंतर उद्धव ठाकरे बोलायला उभे राहिले. ठाकरे बोलायला उभे राहिल्यावर सभागृहातल्या टाळ्या काही वेळ थांबल्या नाहीत. उद्धवसाहेब आम्ही तुमच्या पाठीमागे आहोत, अशा घोषणा सभागृहातील लोकांनी दिल्या. सभागृहातील लोकांचा पाठिंबा पाहून उद्धव ठाकरे भारावून गेले. काही संकेदाचा पॉझ घेऊन ठाकरेंनी बोलायला सुरुवात केली. भुजबळ-बाळासाहेबांचे नाते, ठाकरे कुटुंबासोबत असलेला भुजबळ कुटुंबियांचा स्नेह, असे सगळे सांगताना त्यांनी भुजबळांच्या 'त्या' हुकलेल्या मुख्यमंत्रिपदावर खुमासदार कमेंट केली. अजितदादा म्हणाले, त्यावेळी पाच महिने प्रचाराला मिळाले असते तर भुजबळ मुख्यमंत्री झाले असते, पण मला म्हणायचेय, भुजबळांनी जर शिवसेना सोडली नसती तर ते आधीच मुख्यमंत्री झाले असते! उद्धव ठाकरे यांच्या या हजरजबाबी उत्तराने संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. शरद पवार खळखळून हसले. मंचावरील नेत्यांमध्येही खसखस पिकली, भुजबळ तर अगदी हसून लोटपोट झाले. शेवटी छगन भुजबळांनी हात जोडत ठाकरेंना अभिवादन केले! भुजबळांनी शिवसेना सोडली हा आमच्यासाठी सर्वात मोठा धक्का बसला होता. त्यामुळे आम्हाला सावरायला खूप वेळ लागला. भुजबळांनी एक गोष्ट चांगली केली ती म्हणजे बाळासाहेब हयात असतानाच सगळे मतभेद मिटवले. त्यावेळी माँ असत्या तर अजून चांगले झाले असते, असेही ठाकरे म्हणाले. भुजबळ शिवसेनेतून जाताना एकटे गेले पण आता अख्खी राष्ट्रवादीला मदतीला घेऊन आले. सोबतीला काँग्रेस पण आहे. वादळ निर्माण करणारे लोक माझ्या सोबत आहेत. वादळ असो वा पाऊस न डगमगता उभे राहणार पवारसाहेब सोबत आहेत. तुम्ही सगळे माझ्या सोबत आहेत म्हटल्यावर मला चिंता नाही, असे ऋणही ठाकरेंनी व्यक्त केले.

### चर्चेतली बातमी

# गुजरातमध्ये बहुमतासह सत्ता कायम ठेवणार : अमित शाह

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** आगामी गुजरात विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी भाजपा दोन तृतियांश बहुमताने विजय मिळवून सत्ता कायम ठेवेल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला आहे. गुजरातमधील जनता अनेक काळापासून भाजपावर विश्वास ठेवत आहे. पक्षानेही त्यांच्या इच्छा पूर्ण केल्या आहेत, असे शाह यांनी म्हटले आहे. 'गुजरात गौरव' यात्रेच्या तिसऱ्या टप्प्याला सुरुवात करण्यापूर्वी अहमदाबादेतील झांझरका परिसरातील संत सवाईनाथ धाममधील सभेत ते बोलत होते. झांझरकामधून सुरू झालेल्या या यात्रेचा गीर सोमनाथ जिल्ह्यातील सोमनाथ मंदिरात समारोप होणार आहे. भाजपावर विश्वास ठेवण्याचे आवाहन करतानाच शाह यांनी विरोधी पक्ष काँग्रेसच्या फसवणुकीला बळी न पडण्याचा सल्ला जनतेला दिला आहे. जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० रद्द करण्यासह अयोध्येतील राम मंदिराचे बांधकाम भाजपा सरकारची मोठी कामगिरी असल्याचे शाह यांनी म्हटले आहे. दिवंगत माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरुंच्या चुकीमुळेच काश्मीरचा उर्वरित भारताशी संबंध नव्हता, असा आरोप शाह यांनी केला आहे.

# पाकिस्तानात बसला भीषण आग

आधुनिक केसरी न्यूज

**कराची :** पाकिस्तानमध्ये बसला लागलेल्या भीषण आगीत १८ पूरग्रस्तांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये नऊ महिला आणि आठ लहान मुलांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पुराचे पाणी ओसरल्यानंतर पूरग्रस्त कुटुंब दक्षिणेतील कराचीतून मूळगावी खैरपूर नाथन शाहमध्ये जात असताना ही घटना घडली, अशी माहिती पोलीस अधिकारी हाशिम ब्रोही यांनी दिली आहे. पुराचा तडाखा बसल्याने पाकिस्तानातील हजारो नागरिकांनी कराचीत आश्रय घेतला आहे. या ठिकाणाहून परतत असताना पीडित कुटुंबावर काळाने घाला घातला आहे. बसमधील एसीमध्ये शॉट सर्किट झाल्यामुळे ही दुर्घटना घडली आहे. बुधवारी रात्री उशिरा नुरियाबाद परिसरात लागलेल्या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे. पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचल्याने बसमधील अनेक प्रवाशांचे प्राण वाचले, असे ब्रोही यांनी सांगितले आहे. जखमींवर सध्या जमशोरो आणि नुरियाबादमधील रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. दरम्यान, या दुर्घटनेत पूर्णपणे जळाल्यामुळे काही जणांची ओळख पटवणे प्रशासनासमोर मोठे आव्हान आहे. ओळख पटलेल्या नागरिकांचे मृतदेह त्यांच्या नातेवाईकांकडे अंत्यविधीसाठी पाठवण्यात आले आहेत.

# मुलगा घ्यायला गेला अन् 'ते' देवाघरी गेले

## सहाय्यक पोलिस उपनिरीक्षकांचा अपघात की घातपात?

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** हिंदी विश्वविद्यालयाच्या बाजूला असलेल्या हॉटेल पॅराडाईज येथे जेवण करण्यास जातो म्हणून घरून निघून गेले. जेवण झाल्यानंतर रात्री 12.30 वाजता मला घ्यायला ये म्हणून मुलाला फोन केला. मात्र, मुलगा घ्यायला गेला आणि वडिलाचा अपघात झाल्याचे लक्षात आले. रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. मात्र, प्रकरण संशयास्पद असल्याने अपघात की घातपात, या बाजूने आता पोलिस तपास करीत आहे. विजय ज्ञानेश्वर हातेकर (55) असे अपघातात मृत सहाय्यक पोलिस उपनिरीक्षकांचे नाव असून ते शहर पोलिस ठाण्यात कार्यरत होते. ही घटना 12 रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी मृतकाचा मुलगा प्रकाश हातेकर याने रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक विजय हातेकर हे



बुधवार 12 रोजी रात्री 7.30 वाजता एम.एच. 32 ए.ए. 2684 क्रमांकाच्या दुचाकीने हॉटेल पॅराडाईज येथे जेवण करण्यासाठी निघाले होते. याबाबतची माहिती त्यांनी घरी दिली होती. जेवण झाल्यानंतर रात्री 12.37 वाजता मुलगा प्रकाशला त्यांचा फोन आला आणि मला घ्यायला बायपास मार्गावरील उड्डाणपुलाच्या खाली ये, असे ते म्हणाले. त्यानुसार लहान मुलगा प्रकाश आणि मोठा मुलगा राहुल हातेकर हे दोघे एम.एच. 32 ए.एस. 0467 क्रमांकाच्या चारचाकीने निघाले. सांगितलेल्या ठिकाणी ते जात असताना पुन्हा 12.53 वाजता वडिलांचा फोन करून मी बायपास मार्गावरील पुलाच्या खाली आहे असे सांगितले. थोड्यावेळाने फोन केला असता वडिलांचा फोन बंद दाखवला. वडिलांनी सांगितलेल्या स्थळावर गेलो असता विजय हातेकर हे सर्व्हिस रोडलगत असलेल्या सिमेंट नालीवर पडून असल्याचे दिसले. त्यांच्या शरीरावर जखमा व बाजूला उलटी केल्याचे आढळून आले. दुचाकी व त्यांचा मोबाईलही जवळ दिसला नाही. त्यांची नाडी सुरू असल्याने लगेच त्यांना सावंगी मेघे येथे हलविले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच गुरुवार 13 रोजी उपपोलिस अधीक्षक यशवंत सोळंकी, ठाणेदार चांदेवार, डॉग स्कॉट आणि फॉरेन्सीक एक्स्पर्टची चमूने घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी तपास केला असता घटनास्थळापासून 1 किमी अंतरावर बुद्ध टेकडीच्यावर दुचाकी आढळून आली. त्यामुळे हा अपघात की घातपात, या दिशेने पोलिसांचा तपास सुरू आहे.

# हुश्श्... पुढच्या दोन दिवसांत पाऊस थांबणार


## भारतीय हवामानशास्त्र विभागाचा दिलासा : पश्चिमेतल्या वादळामुळे मान्सून पुन्हा झाला होता सक्रिय

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : मागच्या काही दिवसांपासून मान्सून परतीच्या मार्गावर असल्याचे बोलले जात होते परंतु परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. दरम्यान हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार उत्तर महाराष्ट्रातून थांबलेल्या मान्सून या आठवड्याच्या अखेरीस परतण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याबाबत भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या (IMD) अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

मागच्या 10 दिवसांपासून उत्तरकाशी, नझीयाबाद, आग्रा, ग्वाल्हेर, रतलाम आणि भरुचमधून मान्सून परतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. पुढील 3 ते 4 दिवसांत उत्तर-पश्चिम आणि मध्य भारतातील प्रदेशातून परतण्याची शक्यता असल्याचे असे IMD ने दिलेल्या अहवालात सांगितले आहे. या महिन्यातील 14 आणि 15 तारखेपर्यंत उत्तर प्रदेश आणि बिहारपर्यंत राज्यात मान्सून कमी झालेला दिसेल. तर पुढच्या दोन दिवसांत महाराष्ट्र, छत्तीसगड आणि झारखंडच्या बहुतांश भागांतून मान्सून परतीची वाटचाल करणार आहे. दरम्यान मागच्या काही दिवसांत भारतातील काही भागात परतीच्या मान्सून पावसाने जोरदार हजेरी लावली. पश्चिमेत होत असलेल्या वादळामुळे मान्सून पुन्हा सक्रीय झाला होता. परंतु मागच्या दोन दिवसांत त्याची तीव्रता कमी झाल्याचे दिसून येत असल्याचे पुणे वेदशाळेतील अधिकाऱ्यांनी माहिती दिली. IMD च्या दिलेल्या माहितीनुसार, वायव्य आणि उत्तर भारतात परतीच्या पाऊस पूर्णपणे थांबेल. तसेच 14-15 ऑक्टोबरपर्यंत महाराष्ट्राच्या उत्तरेकडील भागातून पाऊस थांबणार असल्याचे सांगण्यात आले. दक्षिण भारतातील काही प्रदेश वगळता उर्वरित देशात या महिन्याच्या सुरुवातीपासून अतिरिक्त पाऊस झाला आहे. उत्तर प्रदेश (696%), उत्तराखंड (539%), हरियाणा (577%), दिल्ली (625%) आणि मध्य प्रदेश (301% टक्के) पाऊस झाला आहे. मान्सून वायव्य भारतातून 3 ऑक्टोबर रोजी परतल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली. परतीच्या वाटचालीत मान्सूनची उत्तरकाशी, नाझियाबाद, आग्रा, ग्वालियर, रतलाम, भारूच पर्यंतची सीमा तब्बल आठवड्यानंतरही कायम होती. माघारीस पोषक वातावरण होत असल्याने चार ते पाच दिवसांत मध्य भारताच्या काही भागातून मान्सून गायब होण्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहेत. येत्या काही दिवसांत हवेच्या दाबाचा हा पट्टा पश्चिम किंवा वायव्य दिशेला सरकण्याची शक्यता आहे. हा पट्टा दक्षिण विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि आसपासच्या भागातून पुढे जाऊ शकतो.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# तात्या आणि सोमनाथ ...

बरेचदा वेळ असला की मी सोमनाथ मिस्त्रीसोबत गप्पा मारत असे. सोमनाथ जरी सातवी आठवी पर्यंत शिकलेला असला तरी त्याचे इतिहासाचे ज्ञान चांगले होते असे मला आढळून आले. स्वातंत्र्यपूर्व काळातील इतिहास त्याला चांगलाच ज्ञात होता. त्याला मी त्याबद्दल मी विचारले. तेव्हा तो म्हणाला, ' सर, मला वाचनाची अतिशय आवड होती. एखादा वर्तमानपत्राचा किंवा रद्दीतला कागद जरी मिळाला तरी मी तो अधाशासारखा वाचत असे. चालू घडामोडींचेही त्याला चांगले ज्ञान होते. फक्त घरच्या परिस्थितीमुळे त्याला जास्त शिकता आले नव्हते.
सोमनाथ मिस्त्री दिसायला तसा देखणा, उंचपुरा आणि पिळदार शरीर असलेला होता. सोमनाथ मिस्त्रीच्या बाबतीत आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती. तो सकाळी येताना जेवढा फ्रेश असायचा तेवढाच फ्रेश संध्याकाळी परत जाताना असायचा. मला त्याचा हेवा वाटायचा. त्या कालावधीत माझ्या आरोग्याच्या तक्रारी खूपच वाढल्या होत्या. पोटाच्या तक्रारी, अंगदुखी, डोकेदुखी इ नी मला हैराण केले होते. काही टेस्ट केल्यानंतर डॉ नी कोलेस्टेरॉल वाढल्याचे मला सांगितले होते. त्यावेळी सोमनाथ मिस्त्री आणि तात्यांचे एवढे कष्ट करूनही आणि साधे भाकरी चटणीचे जेवण घेऊनही सदैव ताजेतवाने राहणे मला आश्चर्यचकित करणारे होते. एकदा मी सोमनाथ मिस्त्रींना विचारलेच, ' मिस्त्री, तुम्ही नेहमी अगदी फ्रेश दिसता. सकाळी येताना जेवढे फ्रेश असता तेवढेच फ्रेश संध्याकाळी. काय रहस्य आहे ? '
यावर सोमनाथ मिस्त्रीने जे उत्तर दिले त्याने माझ्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. जेमतेम सातवी आठवी शिकलेल्या या माणसाचे आयुष्याच्या बाबतीतले आणि व्यवहाराचे ज्ञान उत्तम होते. सोमनाथ मला म्हणाला, ' सर, पूर्वी मी जिममध्ये व्यायाम करण्यासाठी जात होतो. पण आता जमत नाही. पण रोज सकाळी मी पाच वाजता उठतो. आस्था चॅनेल पाहतो. रामदेव बाबांनी सांगितल्याप्रमाणे योग, प्राणायाम करतो. एकही दिवस हे चुकत नाही. भस्त्रिका, कपालभाती आणि अनुलोम विलोम या प्राणायामाच्या प्रकारांमुळे अगदी फ्रेश वाटते. शिवाय जास्त तेलकट, तिखट, मसालेदार खात नाही. रोज घरचेच जेवण जेवतो.' मला त्याचे फार कौतुक वाटले.
त्याने सांगितलेल्या या गोष्टी मला माहित नव्हत्या असे नाही. पण आपली अवस्था बऱ्याच वेळा कळते पण वळत नाही अशी होते. आम्ही सुशिक्षित माणसे वेळ नाही या नावाखाली व्यायामाला वेळ द्यायचे टाळतो. शारीरिक कष्टही फारसे होत नाहीत. शिवाय अलीकडे हॉटेलिंगचे प्रमाण शहरातील सुशिक्षित वर्गात खूप वाढले आहे. त्यामुळे साहजिकच आरोग्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. सोमनाथ नकळत मला काहीतरी शिकवून गेला होता. मी पूर्वीही योग, प्राणायाम इ करीत होतो पण त्यात नियमितता नव्हती. आता मात्र दररोज सकाळी उठून योग, प्राणायाम नियमितपणे करतो आहे.



# आनंदी पहाट

## मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळविणे आवश्यक

आधुनिक केसरी

अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्याव्यतिरिक्त आणखीन एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनांतील सार कशांत आहे? हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. मिळेल त्यांत समाधानी राहावे असे म्हंटले जाते, पटते का आपल्याला? जे काही मिळते त्यांत आपण खरेच समाधानी राहू शकतो का? समाधानाचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी असतो. त्यामुळे आपल्या अंतर्मनाला जोपर्यंत समाधान मिळत नाही, तो पर्यंत आपण मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळवू शकत नसतो. आपण करत असलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला नेहमीच समाधान मिळवून देतातच असे नाही. आपण करत असलेल्या गोष्टींमध्येच आपण समाधान शोधत असतो. परंतू ज्या गोष्टी आपल्याला समाधान देतील त्यांची आपण निवड करतो का? सुखाचा संबंध अनेकदा शरीराशी जोडला जात असतो. सुखद अनुभवांची आश्वासकता ही मनाला देखील जरुरीची असतेच. परंतू शारीरिक पातळीवर सुखी होण्याची केविलवाणी धडपड आपण दिवसरात्र करत असतो. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आपण सुख मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला अपेक्षित सुख मिळेपर्यंत आपली धडपड सुरुच असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## तुकोबाची वारी | अभंगात ||

मनाच्या शेजारी | असावा एकांत ||
घेईन निवांत | नाम तुझे ||१||

आत्म्याशी संवाद | साधेल त्रीकाळ ||
नाही ताळमेळ | संसारात ||२||

वाचाळाची वस्ती | साधनेस बाधा ||
फुकाचाच सौदा | दांभिकाशी ||३||

आत्ममग्न होता | मौन लिपी कळे ||
विरक्तीची फळे | नाथ दावी ||४||

समाधिस्थ ज्ञाना | प्रगटे अंतरी ||
तुकोबाची वारी | अभंगात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरूपण"

आधुनिक केसरी

## मंगलाचरण

गजानना लंबोदरा। श्रीगणेशा विनायका।।
आद्यनमन करितो। आज या कथाप्रसंगा।।
नमन माये स्वीकारी। रेणुके दासासी तारी।।
कथेत रंगत भारी। भावभक्तीची उभारी।।
शारदाहंससहिता। ऐंबीजधारिणी माता।।
तुचि विद्येची देवता। प्रणाम स्वीकारी आता।।
पितामह गुरुनाथा। भगवानशास्त्रीसन्ता।।
लोटांगणी मी आजोबा। मुखे बोलवावी कथा।।
वेदान्तज्ञानस्वरूपा। श्रीगुरूजीरंगनाथा।।
पायी आलो हो तुमच्या। गोड करा माझी कथा।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# वृत्ति भगवंतमय होणे याचेच नाव भक्ती



आधुनिक केसरी

भगवंतापासून पंचमहाभूते निर्माण झाली; आणि तसे बघितले तर सर्व चमत्कार भगवंताच्या सामर्थ्याने पंचमहाभूतांचेच असतात. भगवंताच्या ठिकाणी जे जे आहे ते ते सर्व आपल्या ठिकाणी आहे. भगवंत हा जगाचा मालक आहे. त्याच्या सत्तेने सर्व व्यवहार घडतात. आपण जीव त्याचा अंश आहोत. म्हणून आपण कर्तव्य करावे, आणि फळ भगवंताच्या इच्छेवर सोपवावे. आता प्रश्न असा आहे की, सर्व गोष्टी जर भगवंताच्या इच्छेने घडतात, तर माझी इच्छाही भगवंत उत्पन्न करतो; आणि असे आहे तर मी माझी इच्छा का मारावी ? अगदी बरोबर आहे. रात्री अंधार पडतो त्याला कारण कोण ? त्याला कारण सूर्य ! कारण सूर्य मावळला की अंधार पडतो. याचा अर्थ असा की, ज्याप्रमाणे प्रकाशाचे कारण सूर्य आहे त्याचप्रमाणे अंधाराचे कारण पण सूर्यच आहे; फरक इतकाच की, प्रकाशाचे कारण तो असणेपणाने आहे, आणि अंधाराचे कारण तो नसणेपणाने आहे. हे जसे खरे, तसे माझ्या इच्छेचे कारणसुद्धा भगवंतच आहे, पण नसणेपणाने कारण आहे इतकेच. सारांश, भगवंताचा विसर पडला की माझी इच्छा जन्म पावते. म्हणून, ज्याला भगवंत हवा असेल त्याने त्याचे स्मरण करावे आणि आपली इच्छा त्याला अर्पण करावी.
आपली देहबुद्धी नष्ट झाली की भगवंत ओळखता येतो. ज्याप्रमाणे इमारतीचा नकाशा कागदावर असतो, त्याचप्रमाणे सगुणमूर्ती हेच आपले परब्रह्म. एकदा नकाशा पक्का झाल्यावर मग इमारत बांधणे जड जात नाही. सगुणमूर्तीचे ध्यान करावे. 'ब्रह्म निराकार आहे, त्याला आकारात आणणे ही चूक आहे,' असे कुणी कुणी म्हणतात, पण मी स्वतः जोपर्यंत आकारात आहे तोपर्यंत सगुणमूर्तीचे पूजन आवश्यकच आहे. 'मी रामाचा आहे' असे म्हणणे म्हणजे 'मी ब्रह्म आहे' असे म्हणणे होय. तदाकार वृत्ती होणे याचे नाव अनुसंधान; आणि अनुसंधानाने वृत्ती भगवंतमय होणे याचे नाव भक्ति. 'ब्रह्म सत्य जग मिथ्या' याचा थोडक्यात अर्थ म्हणजे; 'जग जसे आहे असे आपण समजतो तसे ते नाही.' अंतर्बाह्य परमात्मा दिसू लागणे हेच भक्तीचे लक्षण आहे. याकरिता, आपल्या कृतीकडे भगवंत पाहतो ही जाणीव नेहमी कायम ठेवावी. भगवंतापासून मी दूर आहे ही भावनाच मनात आणू नये. भगवंताच्या प्राप्तीकरता देहाचा सांभाळ करावा. मन रामाकडे गुंतलेले असले म्हणजे देहाचा विसर पडतो. म्हणून नामस्मरणाच्या योगाने मन भगवंताच्या ठिकाणी विलीन करावे. हेच परमार्थाचे सर्व सार आहे.

**आजचे बोधवचन :**
वेदांती ज्याला 'ब्रह्म' असे म्हणतात, त्यालाच भक्त 'नाम' असे म्हणतात.

**– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# समाधान




विशाल मगर
कन्नडकर

आधुनिक केसरी

**प्रत्येकाच्या समाधानाच्या व्याख्या वेगवेगळ्या आहेत तरीही त्याला शेवटी समाधान हे हवं असतं खरंतर अशा तऱ्हेचे समाधान मिळवण्यासाठी काय केले पाहिजे याचा मार्ग श्री समर्थांनी या एका श्लोकात सांगितला आहे तो स्पष्ट करण्यासाठी म्हणजे असे की चिरंतन समाधान मिळावे म्हणून तरुण, बालक, प्रपंची माणसे कोणत्या साधनांचा अवलंब करतात हे त्यांनी प्रथम वर्णन केले आहे ते मार्ग म्हणजे ज्ञान तत्त्वज्ञान कला योग याग व त्याग हे होत.**

जीवनामध्ये प्रत्येक जण समाधान मिळवण्यासाठी झटत असतो समाधानाच्या माध्यमातून त्याला आनंद मिळवायचा असतो आणि आनंद कायम टिकणारा असावा यासाठी त्याला शाश्वत समाधानाचा ध्यास असतो, प्रत्येकाच्या समाधानाच्या व्याख्या वेगवेगळ्या आहेत तरीही त्याला शेवटी समाधान हे हवं असतं खरंतर अशा तऱ्हेचे समाधान मिळवण्यासाठी काय केले पाहिजे याचा मार्ग श्री समर्थांनी या एका श्लोकात सांगितला आहे तो स्पष्ट करण्यासाठी म्हणजे असे की चिरंतन समाधान मिळावे म्हणून तरुण, बालक, प्रपंची माणसे कोणत्या साधनांचा अवलंब करतात हे त्यांनी प्रथम वर्णन केले आहे ते मार्ग म्हणजे ज्ञान तत्त्वज्ञान कला योग याग व त्याग हे होत.

नवे पिंडज्ञाने नव्हे तत्त्वज्ञाने
समाधान काही नव्हे ताणमाने
नवे योगायोगें नवे भोगतेगे
समाधान ते सज्जनांची योगे!!



सृष्टीच्या बाह्य व्यापाऱ्यांचे ज्ञान मनुष्य पंचइंद्रीये मार्फत ग्रहण करतो या ज्ञानामधून त्याला सुख मिळेल अशी कल्पना असते पण जे ज्ञान पंच इंद्रियावर अवलंबून आहे त्याचे स्थिरही त्या पंच इंद्रियांवरच अवलंबून आहे इंद्रिय वयोमानाने क्षीण होत जाणारे असल्याने त्यापासून प्राप्त होणारे समाधान एक क्षण होणारे जाते कारण बालक, तारुण्य, एक वृद्ध अवस्था या अशा अवस्थेतून माणूस जात असताना त्याचा आकर्षण, ध्येय, स्वप्न ही काल मार्गाने कमी होत जातात,
ज्ञानामार्गे किंवा तत्त्वज्ञान यामुळे मनुष्यप्राणी काही काळ तरी चिरंतन सत्याच्या जवळ जाऊ शकेल व त्याला तेवढ्या काळात तरी समाधान मिळू शकेल त्याचप्रमाणे गायनाच्या कलेच्या माध्यमातून ज्याला जेथे एखादा श्रेष्ठ गायक मनपूर्वक गातांना किंवा चित्रकार उत्कटतेने चित्र रंगविताना तेवढ्यापुरते देहभान होत असेल किंवा मीपणा आपला विसरून जाईल त्यावेळी विशिष्ट वेळी आणि काळी तो परमात्म्याच्या जवळ असेल आणि पूर्ण समाधानात निखळ आनंदात राहील, परंतु कलासाधनेचा तो परम्मोच्च क्षण संपला की त्याचे समाधानही भंग पावेल जसे आपल्या लेखनाबद्दल जसा कवी, लेखक सातत्य ठेवणे आणि जर त्याचे सातत्य तुटेल तेव्हा त्याची कलाभंग होणे अन त्याचे समाधानही भंग भावेल. खरा कलाकार तोच जो त्याच्या साधनेशी निरंतर सातत्य ठेवतो.

# लासूरला वॉर्ड पाचमधील रस्त्यावरील खड्ड्यात मुरूम

## दैनिक आधुनिक केसरीचा इम्पॅक्ट : सोशल मीडियावर ग्रामस्थांनी ग्रामपंचायतचे मानले आभार





वॉर्ड क्रमांक पाचमधील रस्त्यातील खड्ड्यात मुरूम टाकण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली असून जेसीबीच्या साहाय्याने मुरूमाची दबाईही केली आहे व पंधराव्या वित्त आयोगातून या रस्त्याचे खडी टाकून मजबुतीकरण करण्यात येणार आहे.
**मीनाताई संजय पांडव (सरपंच)**

आम्ही नागरिकांच्या वतीने ग्रामपंचायतला वॉर्ड क्रमांक पाचमधील नागरी समस्यांचे निवेदन दिले होते. त्यापैकी वॉर्डमधील रस्त्यावरील खड्ड्यात मुरूम टाकण्याचे काम चालू केले असल्याने नागरिकांनी ग्रामपंचायतचे आभार मानले आहे व लवकरच इतरही कामे मार्गी लावावेत अशी मागणी करत आहे.
**मनोज सुरासे (नागरिक)**

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**लासूर स्टेशन :** लासूरला वॉर्ड क्रमांक पाच बनले समस्यांचे माहेरघर या मथळ्याखाली दैनिक आधुनिक केसरीने बातमी प्रकाशित केली होती. नागरिकांनी याबाबत ग्रामपंचायतला निवेदन दिले होते. सात दिवसात नागरी समस्या मार्गी लावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला होता. लासूर स्टेशन ग्रामपंचायतने वॉर्ड क्रमांक पाचमधील विविध रस्त्यातील खड्ड्यांत मुरूम टाकण्याचे काम चालू केले असल्याने सोशल मीडियावर ग्रामस्थांनी ग्रामपंचायतचे आभार मानले आहे. दरम्यान गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील वॉर्ड क्रमांक पाचमध्ये घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिक नागरी समस्यामुळे पुरते वैतागले असून मेटकुटीला आले आहेत. त्यामुळे वॉर्ड क्रमांक पाच समस्यांचे माहेरघर बनल्याने नागरिकांनी ग्रामपंचायतला निवेदन दिले असून त्वरित पेव्हर ब्लॉकचे रस्ते करून ड्रेनेज लाईनचे काम सुरु करून दुर्गंधीचे साम्राज्य संपवावे असेही लेखी निवेदनात म्हटले होते. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला होता व सदर निवेदन एमआयएमचे तालुका उपाध्यक्ष अजित जाधव, शिवसेनेचे नितीन पाटील जाधव, मनोज सुरासे यांच्यासह बाबासाहेब सोमासे, विशाल मूंदड़ा, दिनेश तुपे, राजू शिंनगारे आदिनी ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर मुकणे यांना दिले होते. सात दिवसात नागरी समस्या मार्गी लावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला होता. याबाबत दैनिक आधुनिक केसरीमध्ये बातमी प्रकाशित करण्यात आली होती. याची दाखल घेऊन ग्रामपंचायतने रस्त्यावरील खड्यात मुरूम टाकण्याचे काम युद्ध पातळीवर चालू केले आहे.

# हिंदुत्वविरोधी पक्षांच्या कटात फसलेल्या ठाकरे सेनेवर आता लाल रंगाची झालर!

## भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचे टीकास्त्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** हिंदुत्व हीच ताकद असलेल्या शिवसेनेला हिंदुत्वाच्या मुद्द्यापासून दूर करण्याचा व्यापक कट हिंदुत्वविरोधी राजकीय नेत्यांनी आखला आहे. कम्युनिस्टांनी दिलेला पाठिंबा हा त्या कटाचाच एक भाग असून आता उद्धव ठाकरे यांची शिवसेना या कटात पुरती फसली आहे. शिवसेनेचा भगवा रंग आता लाल झाला आहे, अशी टीका प्रदेश भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शिवसेनेने उद्या 'एमआयएम'चा पाठिंबा घेतला तरी आश्चर्य वाटायला नको, असेही उपाध्ये यांनी नमूद केले. मुंबईतील कम्युनिस्ट नेते आ. कृष्णा देसाई यांची निर्घृण हत्या झाल्यानंतर शिवसेनेने मुंबईत पाय रोवले होते. कम्युनिस्टांचा प्रभाव संपविणाऱ्या त्याच शिवसेनेवर कम्युनिस्टांचा पाठिंबा घेण्याची वेळ यावी हा काळाने उगवलेला सूड आहे. राजकीय पक्षांना आव्हान देणाऱ्या शिवसेनेकडे हिंदुत्वाच्या विचाराची शक्ती असून ती शक्तीच काढून घेण्याचा एक व्यापक कट या विरोधकांनी रचला. त्याचाच भाग म्हणून अगोदर उद्धव ठाकरे यांचे गोडवे गायिले गेले. मग त्यांना पाठिंबा देऊन हिंदुत्वापासून दूर ओढले गेले. आता ठाकरेंची शिवसेना या कटात पुरती फसल्याचे स्पष्ट झाल्यावर याच कटाचा पुढचा अंक म्हणून उद्धव ठाकरेंना सहानुभूती दाखविण्याचा कांगावा सुरू आहे. आता ठाकरेंची शिवसेना यात पुरती फसल्याचे लक्षात येताच माघारीचे प्रयत्नही करून झाले, पण त्यामध्ये यश न आल्याने हिंदुत्वविरोधी पक्षांचा फसवा आधार घेऊन तगण्याची धडपड सुरू आहे, अशी घणाघाती टीका उपाध्ये यांनी केली. हिंदुत्व सोडल्यावर शिवसेनेचा भगवा रंग संपला, आणि ज्यांनी पाठिंबा दिला त्यांचा रंग शिवसेनेने दाखविला. संभाजी ब्रिगेडसोबत गेल्यावर सावरकरांवर बोलणे बंद झाले. आता तर, हिंदुत्वावर न बोलण्याच्या अटीवरच कम्युनिस्टांनी पाठिंबा दिला असून ती अट मान्य केली गेल्याची आमची माहिती आहे, असे उपाध्ये म्हणाले. मित्र म्हणविणाऱ्या या सहानुभूतीदार पक्षांनी आता ठाकरे यांचे पंख पुरते छाटले असून परतीचा मार्गदेखील बंद केला आहे, असेही ते म्हणाले.

# नवे वीज मनोरा धोरण शेतकऱ्यांना सक्षम करणार

## भाजपकडून वीज मनोरा निर्णयाचे स्वागत भाजप प्रदेश सचिव प्रविण घुगे

आधुनिक केसरी न्यूज





**औरंगाबाद :** अति उच्च दाब पारेषण वाहिन्यांसाठीच्या मनोऱ्यांसाठी जमिनीचा मोबदला देण्याकरिता सुधारित धोरणास मान्यता देण्याच्या शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयाचे प्रदेश भाजपने स्वागत केले आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यास न्याय्य मोबदला मिळून शेतकरी अधिक सक्षम होईलच, शिवाय वीजपुरवठ्याचे जाळेदेखील मजबूत होईल असा विश्वास प्रविण घुगे यांनी व्यक्त केला आहे.

शिंदे-फडणवीस सरकारच्या या निर्णयाची माहिती देताना प्रविण घुगे म्हणाले की,वीज मनोरा आणि वाहिनी उभारण्यासाठी जमिनीचे अधिग्रहण न करता केवळ जमिनीचा वापर केला जातो. मनोरा उभारताना जमिनीच्या आणि पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपोटी मोबदला दिला जातो. आता मात्र शिंदे-फडणवीस सरकारने या धोरणात सुधारणा केल्या असून मोबदल्याची रक्कम वाढविली आहे. ६६ केव्ही किंवा त्याहून जास्त दाबाच्या अतिउच्च दाब पारेषण वाहिन्यांकरिता वापरलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाचे रेडीरेकनरमधील किंवा मागील तीन वर्षांतील जमीन खरेदी विक्रीच्या आधारे सरासरी दर यापैकी अधिक असलेल्या किमतीच्या दुप्पट दराने मोबदला दिला जाईल. सरकारच्या या निर्णयामुळे पारेषण कंपन्याचे रखडलेले विविध प्रकल्प मार्गी लागून मनोरा आणि वाहिनी उभारणी वेगाने होवून वीज निर्मितीस मदत होईल, असे ते म्हणाले.

याबरोबरच, मनोऱ्यातून जाणाऱ्या वाहिन्यांच्या पट्ट्याखालील येणाऱ्या क्षेत्रासाठी अतिरिक्त १५ टक्के तसेच रेडीरेकनर किंवा सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराच्या १५ टक्के असा एकूण ३० टक्के मोबदला दिला जाईल. मनोऱ्याने बाधित झालेल्या जमिनीचा मोबदला थेट संबंधित शेतकरी तसेच जमीन मालकाच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी माहिती भाजप प्रदेश सचिव प्रविण घुगे यांनी दिली.

# भाजपच्या आमदारांना चोरट्यांचा झटका

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या साहित्याची, मौल्यवान वस्तू आणि मोबाइल फोनची चोरी होण्याच्या घटना वारंवार घडत असतात. रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सतर्कता बाळगावी लागते. भाजपच्या दोन आमदारांना रेल्वेतील चोरीचा फटका बसला आहे. दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये भाजपच्या मेघना साकारे-बोर्डीकर आणि राम पाटील रातोळीकर या आमदारांचे मोबाइल चोरीला गेल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी मनमाड रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला असल्याची माहिती आहे. पोलिसांनी एका व्यक्तीला ताब्या घेतल्याची माहिती आहे. भाजप आमदार मेघना साकारे बोर्डीकर आणि आमदार राम पाटील रातोळीकर यांना यांचे मोबाइल चोरट्यांनी चोरले आहेत. या प्रकरणी मनमाड रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रेल्वेमध्ये चोरी करणाऱ्यांचा फटका भाजपच्या दोन आमदारांना बसला आहे. मनमाड-नाशिकरोड प्रवासा दरम्यान दोन्ही आमदारांचे महागडे मोबाइल चोरट्यांनी लंपास केले आहेतय मनमाड रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे.

धावत्या रेल्वेत प्रवाशांचे साहित्य चोरी होण्याच्या घटना नेहमी घडत असतात. मात्र, चोरट्यांनी रेल्वेने मुंबईकडे जात असलेल्या भाजपच्या दोन आमदारांचे महागडे मोबाइल चोरी केले आहेत. चोरटे मोबाइल चोरुन फरार झाले आहेत. मोबाइल चोरीची घटना समोर येताच एकच खळबळ उडाली आहे. परभणीतील जिंतूरच्या भाजप आमदार मेघना साकारे-बोर्डीकर या देवगिरी एक्स्प्रेसने प्रवास करत होत्या.

# अखेर लासलगाव येथील ग्रामीण रुग्णालयातील शस्त्रक्रियागृह साडे चार महिन्यानंतर कार्यान्वित

आधुनिक केसरी न्यूज



**रामभाऊ आवारे**

**निफाड :** आशिया खंडातील नंबर एकची कांदा बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव तालुका निफाड येथील ग्रामीण रुग्णालयात बऱ्याच महिन्यांपासून बंद असलेले ऑपरेशन थिएटर अखेरीस आज शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पाटील व शिवसैनिकांच्या पाठपुराव्याने तसेच केंद्रीय कुटुंब कल्याण व आरोग्य राज्यमंत्री डॉ भारतीताई पवार यांच्या प्रयत्नातून आज कार्यान्वित झाले आहे अशी माहिती गट संघटक हभप बाळासाहेब महाराज शिरसाठ यांनी दिली आहे.

ग्रामीण रूग्णालय,लासलगाव ता. निफाड येथील शस्त्रक्रिया गृह शेजारी डिलेवरी कक्षाचे नविन काम चालु असल्यामुळे व तसेच पावसाच्या पाण्याच्या गळतीमुळे पाच महिन्यापासून बंद होते.याबाबत लासलगाव येथील शिवसेना तालुका प्रमुख प्रकाश पाटील यांनी पदाधिकारी सोबत घेत स्वतः ग्रामीण रुग्णालयामध्ये जाऊन वैद्यकीय अधिकारी समवेत समक्ष पाहणी करून याबाबतचे निवदेन केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ.भारतीताई पवार यांना दिले होते. ऑपरेशन थिएटर बंद असल्यामुळे लासलगाव सह परिसरातील बहुतांश रुग्णांना निफाड, पिंपळगाव नाशिक येथे जावे लागत आहे ही बाब लक्षात आणून दिली होती.शस्त्रक्रिया गृहाचे पावसाच्या पाण्याची गळतीची थांबवणे साठी केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ.भारतीताई पवार यांनी वेळीच दखल घेऊन बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना करून तात्काळ दुरुस्ती करण्यात आली.यामुळे परिसरातील गरजु रुग्णांना खूप मोठा दिलासा भेटला आहे.सद्यस्थितीत शस्त्रक्रिया गृहाची स्वच्छता करून,त्याचा तपासणी अहवाल, तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आला होता.तो तपासणी अहवाल निगेटिव्ह आला. त्यामुळे आज १२/१० /२२ रोजी शस्त्रक्रिया गृह सुरू करण्यात आले असून कुटूंबकल्याण शस्त्रक्रिया सुरू करण्यात आल्या आहेत. अशी माहिती वैद्यकीय अधिक्षक व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ बाळकृष्ण अहिरे यांनी दिली. तसेच यापुढेही कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया व सिझीरियन शस्त्रक्रिया सारख्या शस्त्रक्रिया तसेच इतर स्त्रीरोग व शल्य व अस्थिरोग इत्यादी शस्त्रक्रिया सुरू राहतील असे आश्वासन डॉ.बाळकृष्ण अहिरे (-वैद्यकिय अधिक्षक वर्ग -2) व डॉ. स्वप्नील पाटील -वैद्यकिय अधिकारी ,भूल तज्ञ् डॉ.अमित धोंगडे यांनी दिले.यावेळी रुग्णालयातील कर्मचारी गणेश भवर, स्टाफ श्रीमती घुसले, उगले ब्रदर, कनिष्ठ सहाय्यक जोशी, कापसे, राजू जाधव, औषधनिर्माण अधिकारी अहिरे, सोनवणे, ज्ञानेश्वर शिंदे आदी उपस्थित होते. आज शिवसेना तालुका प्रमुख प्रकाश पाटील, सौ. अश्विनी पाटील, मा.प.स सदस्य उत्तमराव वाघ, तालुका समन्वयक केशवराव जाधव, गट संघटक हभप. बाळासाहेब शिरसाठ, दशरथ काळे ,रामदास पवार ,सलीम शेख तसेच इतर पदाधिकारी नागरिकांच्या उपस्थितीत सकाळी साडेदहा वाजता ऑपरेशन गृह सुरू करण्यात आले.शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पाटील व पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री खा भारतीताई पवार, जिल्हा शल्य चिकित्सक अशोक थोरात सर यांचे ऑपरेशन गृह सुरू झाल्यामुळे आभार मानले आहे.

# यजमानपदाची दावेदारी

आधुनिक केसरी

गुजरातमध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे केलेले भव्यदिव्य आयोजन पाहाता ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद मिळवण्याची आपली दावेदारी अधिक भक्कम झाली आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांनी केले. गुजरातमधील सुरत शहरात ३६व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा दिमाखदार सोहळ्यात समारोप झाला. समोराप सोहळ्यास भारताचे उपराष्ट्रपती जगदीश धनखड, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री भुपेंद्र भाई पटेल, क्रीडा मंत्री हर्ष संघवी, कॅबीनेट मंत्री मुकेश भाई पटेल, भारतीय ऑलिम्पिक महासंघाचे सरचिटणीस राजीव मेहता आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वाधिका १४० पदकांची कमाई करत धडाकेबाज कामगिरी केली. गुणतालिकेत महाराष्ट्र सेना दलानंतर द्वितीय स्थानानवर आहे. तर महाराष्ट्राच्या नंतर तिसऱ्या स्थानी हरियाणाचा क्रमांक आहे. उपराष्ट्रपती जगदीश धनखड म्हणाले की, आजचा दिवस मी कधीही विसरू शकणार नाही. ऊर्जा व उत्साह हा सुरेख संगम असलेल्या या सोहळ्यास मी सहभागी होऊ शकलो. अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय विक्रम मोडले, नवे विक्रम निर्माण केले. ही खरोखरच एक शानदार उपलब्धी आहे. खेळाडू गेल्या काही वर्षांपासून या संधीच्या प्रतीक्षेत होते. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन पाहता भारताची ऑलिम्पिक यजमानपदाची दावेदारी भक्कम होणार आहे. याशिवाय टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघ चांगला खेळला. पण पदक जिंकता आले नाही. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व खेळाडूंशी संवाद साधला, त्यांना घरी बोलावले ही खरी आपली संस्कृती आहे. काही काळ आपण ही संस्कृती विसरलो होतो. या स्पर्धेतून खेळाडू निश्चितपणे चांगल्या आठवणी घेऊन जातील. असा विश्वास व्यक्त करुन उपराष्ट्पती जगदीश धनखड यांनी पदक विजेत्यांचे अभिनंदन केले. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पदक विजेत्या खेळाडूंचे कौतुक करताना ज्या खेळाडूंना पदक जिंकता आले नाही त्यांनी पुढील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक जिंकण्याची ऊर्जा या ठिकाणाहून घेऊन जावी, असे आवाहन केले. खेळाच्या माध्यमातून जीवनात नवे काही करण्याची ऊर्जा मिळते. खेळाडू हा कधीच पराभूत होत नाही. तो नव्या उमेदीने पुन्हा उभा राहातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात खेळाचे एक चांगले वातावरण तयार केले आहे. पारंपारिक खेळांबरोबरच आधुनिक खेळांना देखील चालना मिळू लागली आहे. आधुनिक सुविधा उभा राहात आहेत. या स्पर्धेत राष्ट्रीय विक्रम मोडले गेले. हे खेळाडू जगात भारताचा तिरंगा उंचावतील. अशी आशा ओम बिर्ला यांनी व्यक्त केली. गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र भाई पटेल यांनी खेळाडूंचे कौतुक करताना अवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल अभिनंदन केले.

# ।। आनंदाने वाचू या ।।



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**वाचन महत्वाचे का आहे? हा विचार करायला हवा. वाचनाची सवय आपल्याला एक चांगले व्यक्ती बनवू शकते. महान पुरुष आणि स्त्रियांच्या जीवनातून आपल्याला हे शिकायला मिळते की त्यांच्यापैकी बहुतेक जणांना पुस्तके वाचण्यापासून प्रेरणा मिळाली आहे. अब्दुल कलाम यांनी वाचन फक्त एक छंद न करता गरज म्हणून अधिक वाचन केले. पुस्तके आम्हाला प्रेरित करुन ज्ञान देतात. वाचनद्वारे आपण ज्ञानाच्या वेगवेगळ्या स्रोतांशी जोडले जातो.**


माजी राष्ट्रपती डाँ.एपीजे.अ..कलाम यांना आदरांजली म्हणून १५ आक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो.मुलांना वाचनामध्ये गोडी निर्माण व्हावी, वाचनाचे महत्व समजावे ,शाळा-महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी, ती निर्माण व्हावी हाच वाचक प्रेरणा दिनाचा उद्देश आहे.अभ्यास एक अभ्यास न रहाता अवांतर वाचनही आवश्यक आहे.त्याचे अनेक फायदेहि आहेत.अवांतर वाचनाने अनेक संदर्भ मिळतात. आकलनशक्ती वाढते.व्यक्तिगत विकास तर होतोच. राज्यातील प्राथमिक शाळा,माध्यमिक शाळा,महाविद्यालये, यातून हा मुख्यत्वे साजरा व्हावा ह्या उद्देशाने सरकारी पातळीवरूनही निर्देश दिले जातात.वाचन प्रेरणा दिनाचे निमित्ताने शाळा,महाविद्यालयात डाँ कलामांचे पुस्तकांच वाचन व्हावे.एक वाचन कट्टा त्यासाठी निर्माण व्हावा, त्यात सगळ्या विद्यार्थी आणि शिक्षकांचा सहभाग असावा. सामाजिक स्तरावरही ह्याचा प्रसार करुन,ह्या वाचन कट्ट्या साठी पुस्तके गोळा करावी.आणि शाळा शाळा,मध्ये पुस्तक पेढी तयार करावी.डाँ कलाम यांना आदरांजली म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांने पुस्तक वाचण्याचा संकल्प करावा.शिक्षकांनीही कलामांचे पुस्तकांचे वाचन करावे. डाँ कलामांचे लेखन विद्यार्थ्यांन मध्ये सकारात्मक विचारदृष्टी,प्रेरणा देण्याची कार्य करतील, हा विचार या मागे आहे.स्वयंसेवी संस्था,शिक्षकांनी,माजी विद्य्यार्थ्यांनी, पालकांनी,शाळेतील ह्या वाचनकट्ट्याला एक पुस्तक किंवा शक्य तेवढी पुस्तके भेट द्यावीत.

शाळांमधून विद्यार्थ्यांना एक तास मुक्त पणे वाचन करण्याचा आनंद मिळावा म्हणून ठेवावा.त्यांना त्या तासाला पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत. पुस्तके प्रेरणा तर देतातच, पण महत्वाचे म्हणजे ते ज्ञानाचे स्त्रोत आहे.वाचनात अनेकविध गुण आहेत.शब्द संग्रह समृद्ध तर होतोच,पण ज्ञानाची कक्षाही रूंदावते. मनोरंजन हा भाग तर आहेच. शाळा शाळातून चांगल्या पुस्तकांचे चर्चासत्रांच आयोजन करणे,एखाद्या पुस्तकावर व्याख्यान, लेखक,कविना आमंत्रित करुन त्यांच्याशी विद्यार्थ्यांचा संवाद घडवून आणणे,मुलांना बोलत करणे. पुस्तकांच प्रदर्शन, अश्या प्रकारांनी कार्यक्रम केले जावेत. महानव्यक्तिंचे जीवनात वाचनाचा पडलेला प्रभाव ह्या विषयावरचे व्याखान ही आयोजीत केले जाऊ शकते.एखादे पुस्तकावर विद्यार्थ्यांन मध्येही चर्चा घडवून आणाली जावू शकते.

इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे, इंटरनेटच्या मोह जाळामुळे वाचन कमी होतय का? फेसबूक व्हाट्सअप इंस्टाग्राम यात वाचन संस्कृती हरवत चालली आहे का? हा प्रश्न नेहमीच उपस्थित होतो.त्याच उत्तर काही अंशी होय असे आहे. फेसबूक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम, बंद पडल्यामुळे काय परिस्थिती निर्माण झाली होते आणि त्या काळात किती अस्वस्थता येते, हे आपण बघितले आहे अनुभवले आहे. आज ई बुक चे वाचन मुले करतात असा दावा केला जातो. पण तो काही खरा नाही.एक पाच दहा टक्के मुलेही ते वाचत नसावे.हातात पुस्तक घेऊन वाचण्याचा आनंद निराळाच असतो.खरे तर निरनिराळ्या विषयावरील पुस्तके मुलांपर्यंत पोहचणे महत्त्वाचे आहे.

हा एक दिवस साजरा करुन वर्षभर स्वस्थ बसणे,आणि पुढच्याच वर्षी परत एक दिवसाचा वाचन प्रेरणा दिन साजरा करणे हा उद्दिष्टे असू नये.केवळ शिक्षण विभागाचा फतवा येतो,म्हणूनचा उपचार नसावा.दरवर्षी कार्यक्रमाच्या बातम्या तर खूप वाचतो.

शालेय मुलांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून सातत्याने प्रयोग आणि प्रयत्नांची गरज आहे. डाँ.कलाम म्हणतात "विद्यार्थ्यांना घडवणा-या शिक्षका मध्ये ही उच्च गुणांची गरज आहे.तो ज्ञानाने संपन्न असावा.विद्यार्थ्यांशी आपुलकी असावी.



जीवनाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन असावा.केवळ पुस्तकी ज्ञान,शिक्षण देणे,एवढेच न करता मुलांची मने उच्च ध्येयाने प्रज्वलित केली पाहिजे".

विद्यार्थ्यांना टी.व्ही.,स्मार्ट फोन,काँम्पुटर,यापासून काही काळ दूर करुन त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करणे हाच या दिवस साजरा करण्या मागचा प्रमुख उद्देश आहे. अनेक शाळांमधून हा दिवस उत्साहाने साजरा केला जातो. नाही असे नाही.पण-

हा दिवस फक्त तेवढ्याच दिवसा पुरता मर्यादित रहायला नको ह्याचाही विचार व्हायला हवा.

अ.कलाम नेहमीच म्हणत "पुस्तकाच्या सहवासात ज्ञाना बरोबर नेहमीच मला आनंदही मिळाला आहे.ग्रंथ ही माझी सर्वात मौल्यवान अशी ठेव आहे.युवक वाचतील तर देश वाचेल अशी त्यांची खात्री होती. "वाचाल तर वाचाल"अस आपण नेहमीच म्हणतो. पण त्या बोलण्याला ख-या अर्थाने अर्थ प्राप्त व्हायला हवा.

वाचन महत्वाचे का आहे? हा विचार करायला हवा. वाचनाची सवय आपल्याला एक चांगले व्यक्ती बनवू शकते. महान पुरुष आणि स्त्रियांच्या जीवनातून आपल्याला हे शिकायला मिळते की त्यांच्यापैकी बहुतेक जणांना पुस्तके वाचण्यापासून प्रेरणा मिळाली आहे. अब्दुल कलाम यांनी वाचन फक्त एक छंद न करता गरज म्हणून अधिक वाचन केले. पुस्तके आम्हाला प्रेरित करुन ज्ञान देतात. वाचनद्वारे आपण ज्ञानाच्या वेगवेगळ्या स्रोतांशी जोडले जातो.

वाचन मध्ये अनेक गुण आहेत. हे आम्हाला बाह्य जगाशी जोडलेले ठेवते. आमचा शब्दसंग्रह समृद्ध होतो. वाचनातून आपल्याला शुद्ध आनंद मिळतो. कादंबरी, कथा, विविध विषयावरील लेख संग्रह, कविता, प्रवास वर्णन, चरित्र ,आत्मचरित्र, लेख आपल्या मनाचे मनोरंजन करतात. मनोरंजनाबरोबरच ज्ञान मिळते हे महत्वाचे आहे. आपले मन भरकटू देत नाही.वाचनाने आपली कल्पना शक्ती जागृत होते. नवीन नवीन प्रेरणा मिळतात आणि म्हणूनच तो प्रेरणा दिवस आहे. करिता आपल्यातली वाचनाची आवड वृद्धिंगत करावी. आपल्या सगळ्यांनाच वाचन प्रेरणा दिवसातून वाचनाची प्रेरणा मिळवी ही अपेक्षा..तेव्हा आनंदाने वाचू या...वाचून समृद्ध होऊ या....।

# वाचन संस्कृती vs सोशल मीडिया


आधुनिक केसरी

**हल्ली वाचतच कोण? असे सहज बोलणारे वाचना विषयी सहज प्रतिक्रिया देणारे बरेचजण अवती भवती आढळून येतात. पण या सहज मताद्वारे व्यक्त होणाऱ्या वाचना विषयीच्या वर्तमाना बरोबरच्या वाक्यामध्ये वाचन संस्कृतीवर भविष्यकाळामध्ये प्रश्नार्थक चिन्हे उभे राहण्याची समस्या आपोआप निर्माण होत असल्याचे प्रकर्षाने जाणवते. सोशल मिडीयाचा वारेमाप व अवाजवी वापर करणारी आजची मानव जात आपल्या सर्वांगिण विकासाचे दार स्वत:च बंद करीत असल्याचे कोणासही जाणवत नाही. व्हॉटसअप, फेसबुक, व्टिटर, इन्स्टाग्रामचा अविवेकी वापर करुन त्यावर आपल्या अगाध ज्ञानाचे दिप पाजळविणारे तथाकथित तज्ञ व या अभासी मोहिनी विद्यापीठाचा लाभ घेणारे जाणेद्रिय बंद असलेली सोशल मिडीयार्थी वाचन संस्कृतीचे खरे मारेकरी ठरत असल्याचे म्हणणे वावगे ठरणार नाही.**

ग्रंथ वाचनाचे मानवी जीवनातील महत्व, ग्रंथांचे महत्व, ग्रंथांचे मानवाच्या सर्वांगिण विकासात असलेले महत्वपूर्ण योगदान, व्यक्तिमत्व घडविण्यासाठी किंबहुना राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये असलेले ग्रंथाचे महत्व व योगदान दुर्लक्षित करण्याची चूक आजची सोशल मिडीया युगातील मानवजात कशी करु शकते हा प्रश्न नक्कीच पडतो. सोशल मिडीया आधुनिक युगातील गरजेनुसार आवश्यक आहे. यात दुमत असण्याचे कारण नाही. परंतू त्याचा अविवेकी अवाजवी वापर केवळ वाचन संस्कृतीलाच नव्हे तर मानव जातीच्या संस्कारमय विकासासाठी मारक ठरत असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

ग्रंथ वाचनाने मानवी बुध्दिला चालना मिळून सृजनात्मक विचार, कृती येतात याउलट सोशल मिडीयावर कट पेस्ट, कॉपी पेस्ट वृत्ती वाढीस लागून सृजनता लयास जाते. ग्रंथ वाचनाने विचार सूचतात, काहीतरी लिहावे, वाचावे वाटते. परंतू सोशल मिडीयाचा वापर करताना विचार हे सूचत नाहीत तर ते डाऊनलोड होतात. ही खूप मोठी शोकांतिका असून सृजनतेसाठी फारशी चांगली बाब नाही. मॉड विचारची मंडळी आता ग्रंथाची गरजच काय असे म्हणून वाचन साहित्य ई-फॉरमॅट मध्ये एका क्लिकसरशी उपलब्ध असल्याचे मोठया फुशारकीने सांगत असले तरी त्यांना एक प्रश्न विचारावा वाटतो की, प्रत्यक्ष ग्रंथ हातात धरुन वाचण्याचा निखळ आनंद, समाधान ई-साहित्याद्वारे मिळते का याचे उत्तर प्रामाणिकपणे दिल्यास ते निश्चितच नाही. असे येणार याचा अर्थ असा नाही की वाचन साहित्य ई-फॉरमॅट मध्ये करणे, वाचणे चूकीचे आहे असे मुळीच नाही. वाचनसेवा, वाचनसाहित्य आधुनिक रुपडे घेऊन नवनवीन ई-फॅरमॅटमध्ये उपलब्ध होत आहे. ही चांगली बाब आहेच. परंतू याचा वापर खरोखरच वाचनीय आनंद देतो का? किंबहुना खरेच किती मंडळी या ई-साहित्याचा वापर वाचनीय साहित्य म्हणून करतात हा यक्ष प्रश्न आहे.

ई-साहित्य आणि ग्रंथाचे स्थान समजून घेण्यासाठी एक उदाहरण घेऊया पुरेपुर अन्नपदार्थानी भरलेल्या ताटामध्ये वरण भात, भाजीपोळी म्हणजे ग्रंथ होत तर तोंडी लावण्यासाठी ताटामध्ये असलेली चटणी, लोणची म्हणजे ई-साहित्य होय. ई-साहित्याची गरज तात्काळ संदर्भासाठी,



क्षणिक आनंदासाठी म्हणता येईल. परंतू मुद्रीत ग्रंथांची गरज जगण्याचे संदर्भ शोधून ते सापडण्यासाठी, सर्वकालीक आनंदासाठी आहे.

सोशल मिडीयामुळे मानसिक आजार होणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून मानसोपचार तज्ञांच्या मते हा काळ आम्हा लोकांसाठी सुवर्णकाळ असल्याचे भयाण? सत्य सांगतात. आपल्या पोस्टवर इतरांच्या पोस्टपेक्षा कमी कमेंटस, कमी लाईक्स आल्यानंतर निर्माण होणारी अस्वस्थता, असुया स्वतःच्या मानसिक स्वास्था सोबतच परीवार, समाजाचे मानसिक स्वास्थ बिघडविण्यास कारणीभुत ठरत आहे. बाल, युवा व प्रौढ मंडळी सुध्दा निरनिराळया गेमच्या आहारी जाऊन मानसिक रुग्ण तर होतच आहेत. शिवाय अती आहारी जाउन आत्महत्या सुध्दा करीत आहेत. ग्रंथाचे असे नाही. ग्रंथांचे व्यसन लागल्यास ते तुमचे आयुष्यच उजळुन टाकते. ग्रंथ तुमची मानसिक, शारीरीक, भौतिक प्रगती करुन आर्थिक संपन्न सुध्दा करु शकतात. कुणीही ग्रंथवाचक ग्रंथवाचनाने रुग्ण झाल्याचे, ग्रंथ वाचनाने आत्महत्या केल्याचे ऐकीवात नाही. ग्रंथास तुम्ही वाचा, ग्रंथ तुम्हास नक्कीच वाचवतील.

सोशल मिडीयाचे सुध्दा खूप फायदे आहेत. हे सत्य नाकारता येणारच नाही पण एवढेच की त्याचा वापर करतांना तारतम्य बाळगण्या बरोबरच सामाजिक व मानसिक स्वास्थाचा विचार करणेसुध्दा आवश्यक आहे.

सुनील हुसे
सहाय्यक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद

सोशल मिडीयार्थीना कळकळीची विनंती आहे की गरजे पुरता त्याचा वापर करा. त्याला तुमचा वापर करु देऊ नका. तुमच्या हातात असलेला मोबाईल हे एक प्रकारचे खेळणी असून त्याला तुमच्या आयुष्याशी खेळून तुमच्या आयुष्याचा खेळखंडोबा करु देऊ नका. ग्रंथाची संगत धरा, तोची सदोदीत मित्र खरा. आपल्या घरामध्ये प्रत्येक व्यक्तिपरत्वे मोबाईल असतो. तसा व्यक्तिपरत्वे एक ग्रंथ तरी किमान रोज वाचावा म्हणजे समातोल साधला जावून ग्रंथ ॲन्टीबायोटिक्सची भूमिका बजावून तुम्हाला मानसिक रोगी होऊ देणार नाहीत याची खात्री बाळगा. मुलांच्या, परिवारातील कोणत्याही सदस्याच्यां वाढदिवशी नवनवीन मोबाईल भेट देताना एक ग्रंथ आर्वजून भेट द्या. मोबाईल तुम्हाला भौतिक जगाशी संपर्क साधण्यास मदत करेल तर, ग्रंथ आंतरीक सुखमय जगाच्या संपर्कात सतत ठेविल आणखी असे ही कोणासही भेट देताना ग्रंथ आणि रोपटे भेट म्हणून द्यावी. रोपटे वातावरणातील प्रदुषण दुर करेल तर ग्रंथ मानसिक प्रदुषण दुर करेल. आणि हो तुमच्याकडे खूप दिवसापासून एक फ्रेंड रिक्वेस्ट आली आहे कृपया तीचा स्वीकार करा. ती फ्रेंड रिक्वेस्ट आहे एका खास मित्राची आणि तो मित्र म्हणजे ग्रंथ. त्याच्याशी मैत्री करा. तो संपूर्ण आयुष्यभर निस्वार्थी, निष्कपटी मैत्री करुन तुमच्या जगण्याला अर्थ प्राप्त करुन देऊन तुमचे जगणं समृध्द करील यात तिळमात्र शंका नाही.

जगणे सुंदर करण्यासाठी वाचावे,
अंतरी आनंद भरण्यासाठी वाचावे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# स्मरणशक्ती तंत्र विकसित करणारे : सचिनकुमार



सतीश देशपांडे
संपर्क क्र. 9730527669

आधुनिक केसरी

**पाच हजार वर्षांचे कॅलेंडर तोंडपाठ असलेला आणि लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा मानकरी सचिनकुमार याचा मुख्य भर आहे तो विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती वाढवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा. त्याने विकसित केलेल्या तंत्राच्या माध्यमातून हे साध्य सहज साध्य होऊ शकते, असा त्यांना आत्मविश्वास आहे. समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून तो हे काम करतो, परंतु त्याला मिळणारा प्रतिसाद अत्यल्प आहे. त्याला या कामासाठी वाव देणे, संधी देणे जरूरी आहे**

अडखळत बोलणे, प्रश्नाचे नीट आकलन न होणे, बोलताना घाई करणे, परीक्षा देताना काहीच न आठवणे, चारचौघांत बोलताना संकोच करणे ही सारी लक्षणे असलेले अनेक लोक आपण पाहतो. स्वतःवर आत्मविश्वास नसल्याने येत असलेली कामेही करु न शकणारी ही माणसे सातत्याने अपयशाच्या भीतीने ग्रासलेली दिसतात आणि त्याच्याच परिणामी अनेक आत्महत्या होतात, अशी माणसे जगापासून तोंड लपवतात. परीक्षा, स्पर्धा आणि अभ्यासाच्या ताणातून अपयशाची भीती आणि त्यातून विद्यार्थ्यांच्यया घडणा-या आत्महत्या ही आज खूप मोठी सामाजिक समस्या बनली आहे. मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण करणारे काही घटक आहेत आणि ते बाजूला सारता आले तर कुठलीही व्यक्ती वा कुठलेही मूल जीवनात नक्कीच यशस्वी, आनंदी बनू शकेल.

मात्र अशी काय जादू आहे, की ज्यामुळे हे सारे शक्य होईल ? आज अनेक समाजशास्त्री, विचारवंत यावर विचार करीत आहेत. अशा या गोंधळाच्या वातावरणात एक छोटेसे तंत्र शिका आणि गमावलेला आत्मविश्वास परत मिळवा असे कुणी म्हटले तर त्यावर सहजासहजी विश्वास बसणार नाही.स्मरणशक्ती संदर्भात, स्वभावासंदर्भात अनेक गैरसमज आपण बाळगलेले आणि जोपासलेले आहेत. जन्मजात बुध्दिमत्ता ही देणगी असू शकते परंतु प्रयत्नपूर्वक बुध्दिमत्ता प्राप्त करता येऊ शकते परंतु प्रयत्नपूर्वक बुध्दिमत्ता सांगतो तो, पाच हजार वर्षांची कॅलेंडर जिभेवर बाळगणारा, स्मरणशक्तीचे अचाट आणि अशक्यप्राय प्रयोग करुन दाखविणारा लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा विजेता सचिनकुमार.

मूळ औरंगाबादच्या सचिनकुमारने स्मरणशक्तीचे अतिशय अनोखे, आश्चर्यकारक प्रयोग सादर करुन जगाला थक्क करुन सोडले असले तरी तो तुमच्या - आमच्यासारखाच एक सर्वसाधारण विद्यार्थी. गोवा आणि मुंबईत त्याचे शिक्षण झाले. लहानपणापासून सैन्य दलात अधिकारीपदावर जाण्याची मनापासून इच्छा. मात्र अनेक वेळा प्रयत्न करूनही त्याला ते साध्य झाले नाही. नंतर त्ययाला अभियांत्रिकी प्रवेश मिळाला. परंतु पहिल्या वर्षी तो एक विषय वगळता सर्व विषयांत अनुत्तीर्ण झाला. दुस-या वर्षीही तोच प्रकार. सलग दोन वर्षे अनुत्तीर्ण झाल्यानंतर त्याने काही तरी वेगळे करण्याचा विचार सुरु केला. वाचनाची आवड तर त्याला होतीच. शहरात बुध्दिमत्ता वाढविणारे, हिप्नॉटिझम, वैदिक गणित अशा अनेक कार्यक्रमांना, प्रयोगांना त्याने हजेरी लावली. स्मरणशक्ती या विषयावर लक्ष केंद्रित करुन ती कशी वाढविता येईल, यासाठी त्याने वेगवेगळयसा पध्दती विकसित करायला प्रारंभ केला. इतरांसाठी काम करताना त्याची स्वतःची प्रगती होत गेली आणि त्याने अभियांत्रिकीची पदवीही मिळविली, नोकरीही मिळविली.

स्मरणशक्ती वाढीसाठी विद्यार्थ्यांनी काय करायला हवे, त्याची काही तंत्रे त्याने विकसित केली आणि त्याचे निःशुल्क प्रात्यक्षिक, प्रशिक्षण द्यायला प्रारंभ केला. काही शाळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि त्यांना त्याचा लाभही झाला. परंतु काही शाळांनी अशा उपक्रमांमध्ये आम्हाला काहीही रस नसल्याचे निक्षून सांगितले.



**मेमरीकिंग सचिनकुमार**
**एम. ए. (योगशास्त्र), India (National) Team Coach for Mental Fitness & Yoga Coach.**
**trainurbrain3084@gmail.com**
**WhatsApp No. 9975577762.**

मुलांसाठी काम करायचे या भावनेने त्याने नोकरी सोडली आणि पूर्ण वेळ कामाला प्रारंभ केला. मुलांमध्ये नैसर्गिक हुशारी असायलाच हवी असा त्यांचा आग्रह मुळीच नाही, मात्र स्मरणशक्ती वाढविण्याचे तंत्र शिकल्यानंतर सर्वसाधारण मुलगाही हुशार म्हणून गणला जाऊ शकतो, असे त्यांचे म्हणणे आहे. या तंत्रामध्ये आकलन शक्तीची कसोटी मात्र लागते. कल्पना करु शकणा-यांची स्मरणशक्ती या तंत्राव्दारे विकसित करता येते, ही संकल्पना समजावून सांगणे, तंत्र शिकविणे ही केवळ दोन दिवसांची प्रक्रिया आहे परंतु नंतर सातत्याने सराव आवश्यक असतो. इतिहासातील विविध सनावळया, घटना, प्रसंग, तारखा यांच्याबरोबरच गणितातील अवघड समीकरणे, आकृत्या, व्यक्ती, चेहरे असे सर्वकाही कायमस्वरुपी लक्षात ठेवता येऊ शकेल असे हे तंत्र आहे.

हे तंत्र विकसित करताना त्याला अनेक चांगल्या वाईट प्रसंगांना तोंड द्यावे लागले, अनेक वेळा अडचणीतही आणण्यात आले. मात्र प्रत्येक अडचण ही संधी बनवून त्याने आपले प्रयत्न सुरु ठेवले, आपले तंत्र अधिकाधिक निर्दोष, सर्वसमावेशक कसे करता येईल यासाठी प्रयोग केले. या तंत्रावर पुरेशी हुकमत प्रस्थापित झाल्यावर त्याने नोकरी सोडली आणि समाजासाठी, विद्यार्थ्यांसाठी पूर्ण वेळ कामाला प्रारंभ केला.

विद्यार्थ्यांना अभ्यास करताना संभ्रम कमी होईल, संज्ञा, संकल्पना लक्षात राहून अभ्यास सोपा होईल, परीक्षांमधून चांगल्या यशाच्या माध्यमातून चांगले करिअर घडविता येईल, अशी ही साखळी यशस्वी करण्याचे तंत्र सचिनकुमारने विकसित केले आहे. दैनंदिन जीवनातही लहानमोठया प्रसंगांना आत्मविश्वासाने तोंड देण्याचे हे तंत्र आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये आवड निर्माण करणाऱ्या या तंत्राला साहयभूत ठरणारे एक मेमरी कार्डही त्याने विकसित केलेले आहे. मुळामध्ये आपल्यामध्ये सर्वकाही असतेच, त्यांची योग्य मांडणी, जुळवाजुळव आणि क्रम लावणं या तंत्रातून शिकवलं जातं. जीवन आत्मविश्वासपूर्ण आणि आनंदी बनविणारे हे तंत्र शक्य होईल तितक्या व्यक्तींपर्यंत पोचविण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

सचिनकुमार आज समाजासाठी, विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क मार्गदर्शन करु इच्छितो, परंतु त्याला प्रतिसाद अतिशय अल्प मिळतो. शाळा, महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण देणा-या संस्था यांच्याशी संपर्क साधूनही त्याला तेथे मुलांशी संवाद साधण्याची संधी मिळू देण्यात आली नाही. महापालिका, जिल्हा परिषदांच्या शाळांतून असे कार्यक्रम करण्यासाठी संबंधितांचे पत्र मिळवूनही त्याला एकाही शाळेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. सा-या व्यवस्थेबद्यलच तो थोडीशी निराशा व्यक्त करतो. योगगुरु स्वामी रामदेव यांचा आदर्श बाळगणारा सचिनकुमार विद्यार्थी आणि इतही सर्वांना आनंदी, समृध्द जीवन देण्याची आस बाळगून आहे. प्रश्न आहे तो त्याच्या या प्रयत्नांना प्रतिसाद देण्याची. धकाधकीच्या, जीवघेण्या स्पर्धेच्या या काहात टिकून राहण्यासाठी आत्मविश्वास ही गुरुकिल्ली आहे. ती मिळवायला हवी यासाठीच्या सचिनकुमारच्या प्रयत्नांना समाज, शासनाने सकारात्मक प्रतिसाद द्यायलाच हवा.

# विचाराने लोक प्रभावित होतील असं व्यक्तिमत्त्व होता आलं पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सध्या जग अगदी गतिमान आणि चंचल झालं आहे. आपल्याकडे असणारी भौतिक संपदा किंवा संसाधने ही इतरांना दाखविण्यासाठी जणुकाही स्पर्धा लागली आहे का असंच कधी-कधी वाटतं. आपली संपदा हि लोकांना दाखविण्यासाठी नसतीच मुळी. अनोळखी लोक वेशभूषा-दागिने यांनी जितक्या लवकर प्रभावित होतात तितक्या लवकर वास्तविक स्वरूप ओळखतात. पण आपल्या विचारांनी जे प्रभावित होतात ते आयुष्यभर विचारांचे पाईक होतात.**

एक काळ असा होता की, अंगभर कपडा मिळणं कठीण होतं. अगदी राजे-महाराजे, सेनापती, विशिष्ट लोक यांचा पेहराव-वेशभूषा ही लक्षणीय आकर्षक असायची. पण आज परस्थिती बदलली आहे. प्रत्येक व्यक्ती हवे तसे कपडे , हवे ते अंलकार घालू शकतो आणि आपली वेशभूषा जबरदस्त पद्धतीने आकर्षक बनवु शकतो. पण वेशभूषा नाही तर वैचारीकता हेच आदर्श व्यक्तिमत्वाच लक्षण आहे. आपण इतिहासाचा मागोवा घेतला तर लक्षात येईल. अनेक महापुरुष योगी तपस्वी सिद्धपुरूष होऊन गेले. त्यांच्या विचारांचा प्रभाव लोकांवर आजपर्यंत टिकुन आहे. भविष्यात पण राहिल. पण हल्ली विचारांऐवजी लोक वेशभूषा पाहुण प्रभावित होतात हे वास्तव आहे. प्रगती करण पुढं जाणं हा सगळ्यांचा अधिकार आहे. पण मार्ग हा आपआपल्या इच्छेनुसार निवडायचा असतो. प्रत्येकजण जीवनात आपण एखाद्या क्षेत्रात तरी आपलं नावलौकिक केल पाहिजे. यासाठी अहोरात्र धडपडत असतो. त्यासाठी नानाविध प्रयत्न आणि वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब पण वेळप्रसंगी केला जातो. एकंदरीत काय तर कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही पद्धतीचे प्रयत्न करून लोक प्रभावित करता आले पाहिजेत किंवा झाले पाहिजेत हाच अंतिम हेतु असतो. मग भौतिक संसाधन वापरून लोकांना क्षणिक प्रभावित करण्या ऐवजी विचारांनी अनेक पिढ्या प्रभावित होतील असं व्यक्तिमत्त्व होता आलं पाहिजे. आपल्या जीवनातील आवश्यक असणाऱ्या गरजा ज्यामध्ये अन्न-वस्त्र-निवारा यापैकी वस्त्र ही आवश्यक गरज आहे इथपर्यंत बरोबर आहे. पण वस्त्र वेशभुषा ही आपली परंपरा आहे. पण हल्ली हिच परंपरा फॅशन झाली आहे. वेशभूषा लोकांना प्रभावित करण्याच माध्यम झाली आहे. वेगवेगळ्या पद्धतीचे कपडे परिधान करण यामध्ये काही गैर नाही. पण हे कपडे कोणालाही प्रभावित करण्यासाठी नसले पाहिजेत. वास्तविक कपड्यांनी-दागिन्यांनी लोकांना प्रभावित करण्यापेक्षा आपल्या विचारांनी लोक प्रभावित पाहिजेत असं व्यक्तिमत्त्व होता आलं पाहिजे. कपडे, दागिने, अभुषण पाहुन तर प्रथमदर्शनी कोणीही सहजासहजी प्रभावित होत. पण हे प्रभावीत होणं क्षणिक असत. फार काळ टिकणार नसतं. सध्या लोक भौतिक संसाधन पाहुन प्रभावित होतात. हा वेळेचा प्रभाव आहे आणि कालयुगाच वैशिष्ट्य....! पण ख-याअर्थाने विचाराने, संस्काराने लोक प्रभावित होतील असं व्यक्तिमत्त्व होता येण ही सगळ्यात मोठी उपलब्धी आहे. कपडे, लत्ते , दागिने, किंवा भौतिक स्वरूपाचे अभुषण परिधान करून पृथ्वीवरील कोणीही लोकांना प्रभावित करू शकत. यामध्ये फार काही अवघड गोष्ट नाही. पण खरं कौशल्य आहे ते विचारांनी लोक प्रभावित झाले पाहिजेत असं होता येण. सध्या जग अगदी गतिमान आणि चंचल झालं आहे. आपल्याकडे असणारी भौतिक संपदा किंवा संसाधने ही इतरांना दाखविण्यासाठी जणुकाही स्पर्धा लागली आहे का असंच कधी-कधी वाटतं. आपली संपदा हि लोकांना दाखविण्यासाठी नसतीच मुळी. अनोळखी लोक वेशभूषा-दागिने यांनी जितक्या लवकर प्रभावित होतात तितक्या लवकर वास्तविक स्वरूप ओळखतात. पण आपल्या विचारांनी जे प्रभावित होतात ते आयुष्यभर विचारांचे पाईक होतात. म्हणुन जीवनातील सगळ्यात मोठी गोष्ट, बाब हीच आहे की, आपण आपल्या जीवनात कोणत आणि कसं व्यक्तिमत्व झालं पाहिजे. कपडे, दागिने परिधान करून क्षणिक आपल्याला मी खुप मोठा आहे, सदन आहे, श्रीमंत आहे, हे सहज पणे दाखवता येईल. पण विचारांची श्रीमंती ही सहज मिळत नाही. त्यासाठी अफाट कष्ट, प्रचंड त्याग, वैचारिक प्रगल्भता, प्रदीर्घ अनुभव, खडतर संघर्ष, या सगळ्यातुन परिपक्व होऊन पुढे जावं लागतं. तेंव्हा वैचारिक व्यक्तिमत्व घडत आणि जेंव्हा वैचारिक व्यक्तिमत्व घडत, तेंव्हा ते चिरकाल टिकणारे असत. आणि भविष्यातील अनेक पिढ्यांच्यासाठी ते प्रेरणादायी असतं. मग कपडे, दागिने परिधान करून आपण किती दिवस प्रभावित करणार तर खूप कमी दिवस. आणि विचाराने संस्काराने अनेक पिढ्यांच्यासाठी आपणं प्रेरणादायी ठरणार म्हणून कपडे, दागिने यापेक्षा विचाराने संस्काराने लोकांना प्रभावित करणार व्यक्तिमत्व होण उत्तम....!!

# समाजवादी विचारधारेचे पाईक : मुलायमसिंग यादव



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**१९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायमसिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती.**

समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांचे सोमवारी दिनांक १० ऑक्टोबर रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांचा पाईक असलेला एक खंदा कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला आहे. मुलायमसिंग यादव यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशातील सैफई गावात जन्मलेले मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायमसिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायमसिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मिळून पुढे जनता दल या पक्षाची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायमसिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले. याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला.



त्यामुळे ते काँग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा काँग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायमसिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला. उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात. त्यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. मुलायमसिंग यादव यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# सहकारी साखर कारखान्यांच्या जागतिकीकरणाची संकल्पना



आहेर वा. र.
संपर्क क्र. : 9958782982

आधुनिक केसरी

भारतातील आणि महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना 1948 मध्ये अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या नेतृत्वात स्थापन झाला. पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील आणि डॉ.डी. आर.गाडगीळ यांचा प्रवरानगर येथे सहकार क्षेत्रातील साखर कारखाना संघटित करण्याचा आद्य प्रयत्न होता आणि स्वातंत्र्यानंतर सहकारी साखर कारखान्याची कल्पना प्रत्यक्षात आली. या यशस्वी प्रयत्नामुळे अनेक ऊस उत्पादकांना एकत्र येऊन साखर कारखाने स्थापन करण्यास प्रोत्साहित केले. राज्यातील ऊस उत्पादनात वाढ झाली आहे. या पेपरमध्ये जागतिकीकरणाच्यापार्श्वभुमीवर भारतातील सहकारी साखर कारखान्यांचा समावेश व्हावा हा उद्देश आहे. साखर उद्योग हा भारतातील सर्वात मोठ्या कृषी आधारित प्रक्रिया उद्योगांपैकी एक आहे. साखर उद्योग, त्याच्या मूल्यवर्धन वैशिष्ट्यामुळे, देशाच्या ग्रामीण भागात आर्थिक आणि सामाजिक विकासाचे एक अतिशय शक्तिशाली साधन बनले आहे. ग्रामीण भागात असलेल्या उद्योगाचा ग्रामीण लोकसंख्येच्या आर्थिक कल्याणाशी जवळचा संबंध आहे. साखर उद्योगात उसातील उपलब्ध साखरेपासून जास्तीत जास्त साखर काढणे ही कार्यक्षमता मानली जाते. खर्च कमी करण्यासाठी उपायांपैकी एक म्हणजे एक्स्ट्रॅक्शन कार्यक्षमतेचे ऑप्टिमायझेशन आणि उत्पादन खर्चातील तोट्यावर नियंत्रण. नुकसान कमी करणे म्हणजे ऊसाच्या रिकव्हरीत वाढ. साखर उद्योगात प्लांट ऑपरेशनची एकूण कार्यक्षमता हा सर्वात महत्वाचा घटक आहे.

**जागतिकीकरणासाठी सहकारी साखर कारखान्यांची उद्दिष्टे**

खालील मुद्द्यावर लक्ष केन्द्रीत करणे आवश्यक आहे.

1) सहकारी तत्व "एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ किंवा सामूहिक प्रयत्नांच्या परिणामकारकतेने वाढीव उत्पादन मिळवणे आवश्यक आहे.

२) ऊस उत्पादक, कामगार, ग्राहक आणि समाजामध्ये उत्पादकतेच्या नफ्याचे न्याय्य वाटप करणे गरजेचे आहे.

3) कृषी आणि औद्योगिक मजुरांसह समाजातील विविध घटकांच्या पुनर्वसनासाठी परस्पर दायित्व आणि काळजीची भावना निर्माण करणे गरजेचे आहे. .

4) कारखान्यातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या उच्च राहणीमानासाठी चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यातून त्यांचे शोषण दूर करणे आवश्यक आहे.

5) ग्रामीण भागातील कुशल, अर्धकुशल आणि अकुशल लोकांना उत्तम रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे आवश्यक आहे.

6) उत्तम मालक-कर्मचारी संबंध राखण्यासाठी आणि व्यवस्थापन आणि कारखान्याशी संबंधित व्यक्ती यांच्यातील संबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

7) सदस्यांना त्यांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी विविध वेतनेतर लाभ आणि सेवा प्रदान करणे करणे आवश्यक आहे.

8) विकेंद्रीकरणाद्वारे आर्थिक शक्ती काही हातांमध्ये केंद्रीत करणे आणि संरक्षक लाभांशाच्या तत्त्वाच्या आधारे उत्पादकांना प्रोत्साहन देऊन अधिक ऊस मिळविण्यासाठी ऊस लागवडीच्या पद्धती विकसित करणे आणि सुधारणे करणे आवश्यक आहे.

९) सभासद व बिगर सभासदांच्या उसाला उच्च दर देऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणे करणे आवश्यक आहे.

10) सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून देशाच्या औद्योगिक क्षेत्राच्या विकासात ग्रामीण नेतृत्वाचा वाटा उचलणे करणे आवश्यक आहे.

**साखर क्षेत्राची सध्याची परिस्थिती**

इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (ISMA) ने 2022-23 साखर हंगामासाठी (ऑक्टोबर-सप्टेंबर) देशातील एकूण ऊसाखालील क्षेत्र सुमारे 58.28 लाख हेक्टर असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. 2021-22 च्या हंगामाच्या तुलनेत हे प्रमाण सुमारे चार टक्क्यांनी जास्त आहे, जेव्हा उसाचे क्षेत्र सुमारे 55.83 लाख हेक्टर होते. ISMA नुसार, 2022-23 मध्ये साखरेचे उत्पादन 355 लाख टन असण्याचा अंदाज आहे, जो सप्टेंबरमध्ये संपलेल्या चालू विपणन वर्षात 360 लाख टन होता. इथेनॉलकडे वळवण्याआधी चालू 2021-22 विपणन वर्षात 394 लाख टनांच्या तुलनेत निव्वळ साखर उत्पादन 2022 -23मध्ये 399.97 लाख टन जास्त असण्याचा अंदाज आहे.. ISMA चा अंदाज आहे की उसाचा रस आणि बी-मोलासेस इथेनॉलमध्ये वळवल्याने पुढील विपणन वर्षात साखर उत्पादन सुमारे 45 लाख टनांनी कमी होईल. चालू 2021-22 विपणन वर्षात, सुमारे 34 लाख टन वळवण्याचा अंदाज आहे. 2022-23 मध्ये वार्षिक देशांतर्गत मागणी सुमारे 275 लाख टन एवढी आहे, ज्यामुळे निर्यातीसाठी सुमारे 80 लाख टन अतिरिक्त शिल्लक राहील. देशांतर्गत उपलब्धता आणि किंमत स्थिरता राखण्यासाठी मे महिन्यात केंद्राने चालू 2021-22 विपणन वर्षात साखर निर्यात 10 दशलक्ष टनांवर मर्यादित केली.

**प्रक्रियेसह प्रति टन उसासाठी दर देण्याचे अर्थशास्त्राचे उदाहरण**

सरकारने 10.२५% रिकव्हरीसाठी उसाची प्रति टन वैधानिक किमान किंमत (SMP) 3050 रुपये ठरवली.प्रति किलो साखरेचा एमएसपी @ रु. 31 प्रति किलो साखरविक्रीदर गृहितधरलेले आहे.



**भारतातील सहकारी साखर कारखानदारीमधील समस्या**

1. योग्य नियोजनाचा अभाव - सहकारी साखर कारखान्यांमध्ये पद्धतशीर नियोजन आढळत नाही. खेळत्या भांडवलाची नेहमीच कमतरता असते. ऊस लागवड आणि तोडणी नियोजनाचा अभाव आहे. साखर मार्केटिंगचे चांगले नियोजन नाही.

2. चांगल्या उत्पादन व्यवस्थापनाचा अभाव - सहकारी साखर कारखाने साखर उत्पादनाचे प्रभावी व्यवस्थापन करू शकत नाहीत. आजकाल सहकारी साखर कारखाने वर्षाला फक्त ९० ते १०० दिवस चालतात. ते निर्यात दर्जाची शुद्ध साखर, कच्ची साखर, इनव्हटेड साखर इ. (काही अपवाद वगळता) उत्पादन करत नाहीत.

3. राजकीय हस्तक्षेप -राजकीय हस्तक्षेप ही सहकारी साखर कारखान्यांची प्रमुख समस्या आहे. काही सहकारी तज्ज्ञांनी अनौपचारिकपणे सांगितले आहे की सहकारी साखर कारखाने हे सरकारी विभागाचे विस्तारक आहेत. सहकारी साखर कारखान्यांना भांडवली गुंतवणूक, साखर विक्री, कर्ज धोरण आदींसाठी साहित्य व यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते.

4. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव - सहकारी कारखान्यांमध्ये धोरणात्मक व्यवस्थापन आणि व्यावसायिक व्यवस्थापनाचा कार्यक्षमतेने वापर केला जात नाही. बहुसंख्य सहकारी कारखाने सध्या पारंपरिक पद्धती वापरत आहेत.

5. मनुष्यबळाच्या योग्य वापराचा अभाव - ही जास्तीची भरती सरकारी निकषांनुसार सुमारे 30% आहे. राजकीय पार्श्वभूमी इत्यादीसह विविध कारणांमुळे विद्यमान मनुष्यबळ त्यांच्या पूर्ण कौशल्याचा आणि श्रमाचा वापर करत नाही.

६.कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे मानक मोजमाप तंत्राचा आणि चांगल्या उत्पादकतेचा अभाव - भारतातील खाजगी साखर कारखान्यांच्या तुलनेत भारतीय सहकारी साखर कारखान्यांची एकूण उत्पादकता कमी आहे. उसातील साखरेच्या प्रमाणात, साखरेचे उत्पादन आणि इतर उत्पादनांचे प्रमाण कमी असते.

7. अत्याधिक सरकारी निर्बंध - राज्य आणि केंद्र सरकारने सहकारी साखर कारखान्यांवर अनेक निर्बंध आणि प्रक्रियात्मक औपचारिक बंधने घातली आहेत. परवाना, झोनिंग, निविदा पद्धतीने साखरेची विक्री, उप-उत्पादनांच्या विक्रीवर निर्बंध, तयार उत्पादनांची किंमत इ. ही काही उदाहरणे आहेत. या सर्व निर्बंधांचा परिणाम सहकारी साखर कारखाना व्यवस्थापनावर होत आहे.

8. खर्च जागृतीचा अभाव - सहकारी साखर कारखान्यांमध्ये साखर उत्पादन खर्च जास्त असल्याचे निदर्शनास आले. प्रत्येक कामाचे केंद्र किंवा खर्चाचे केंद्रावर; खर्च जास्त आढळतो. शेवटी साखरेचा उत्पादन खर्च जास्त असतो.

9. आर्थिक स्वयंपूर्णतेचा अभाव- सहकारी साखर कारखाने 1:9 च्या प्रमाणात भांडवल गुंतवत आहेत. याचा अर्थ सहकारी साखर कारखाना 10% गुंतवणूक करतो आणि 90% निधी सरकारसह बाहेरील वित्तीय संस्थांकडून असतो. सहकारी साखर कारखाने इतर वित्तीय संस्थांवर अधिक अवलंबून असल्याचे यातून स्पष्ट होते.सभसदांच्या ठेवी स्वीकारण्यास अनेक निर्बंध आहे.

10. पणन तंत्राचा अभाव - साखर विक्रीसाठी कारखाने केवळ निविदा पद्धती वापरत आहेत. सहकारी कारखाने साखर विक्रीसाठी कोणतेही व्यावसायिक तंत्र वापरत नाहीत. साखर बाजार संशोधन, 4P's, बाजार क्षमता, साखर फॉरवर्ड ट्रेडिंग आणि स्पर्धकांचा अभ्यास, साखरेचा आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादी सहकारी साखर कारखान्यांकडून होत नाहीत आणि त्यामुळे आर्थिक तुटवडा निर्माण होतो.त्यामुळे भाव कमी मिळतो. उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य वापर होत नाही.

**जागतिकीकरणाची संकल्पना**

सहकारी साखर कारखान्यांनी जागतिकीकरणाची संकल्पना साध्य करण्यासाठी पुढील संदर्भात निर्णय घेतले पाहिजेत.

1. मानक प्रमाणे रूपांतर खर्च रु. 900 प्रति टन ऊस पर्यंत कमी केला पाहिजे.

2. मनुष्यबळाच्या योग्य वापराची व्यवस्था करावी.

3. आपण A.B.C चा अवलंब केला पाहिजे. आणि V.E.D. इन्व्हेंटरी व्यवस्थापनाची तंत्रे. JIT आणि Kaizen तंत्रांप्रमाणे झिरो इन्व्हेंटरी तंत्र वापरावे. चांगल्या इन्व्हेंटरी व्यवस्थापनासाठी जवळच्या साखर कारखान्यांनी "केंद्रीकृत यादी" प्रणालीचे पालन केले पाहिजे.

4. साखर आणि पॉवर, सीएनजी, पेपर,इथेनॉलसह विविध उत्पादनांचे प्रभावी उत्पादन आणि विपणनाची व्यवस्था करावी लागेल.

5. आपल्याला प्रतिदिन गाळप क्षमता वाढवावी लागेल.

6. आपल्याला मिल आणि बॉयलिंग हाउस एक्स्ट्रॅक्शनमध्ये वाढ करावी लागेल.

7. आपल्याला स्थिर आणि परिवर्तनीय खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल.

8. साखर उत्पादनासाठी वर्षातील किमान160 दिवस कारखानेचालवावे लागतील.

9. स्टीम आणि पॉवर, मॅन्युफॅक्चरिंग स्टोअर्स आणि चुना खर्चावर नियंत्रण. सर्व साखर कारखान्यांनी सहवीजनिर्मितीद्वारे ऊर्जेसाठी स्वयंपूर्ण व्हावे, ज्यामुळे विजेचा खर्च कमी होईल आणि अतिरिक्त वीज विकून अतिरिक्त उत्पन्न मिळेल. व्यवस्थापनाने सर्व उपयुक्तता खर्च नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

10. व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांची संख्या कमी करून पगार आणि वेतन नियंत्रित केले पाहिजे.

11. आम्हाला पॅकेजिंगची किंमत आणि साठवण खर्च कमी करावी लागेल.

12. आपल्याला संगणकीकरण आणि ऑटोमेशनच्या मार्गाने सामान्य आणि प्रशासकीय खर्च नियंत्रित करावे लागतील.

१३.साखरेचे रिटेल मार्केटिंग, साखरेचे फॉरवर्ड मार्केटिंग या मार्गाने विक्री वाढवायची आहे.

14. सहकारी साखर कारखान्यांनी चालू देयकांसाठी त्वरित पेमेंट करण्यासाठी 2:1 वर्तमान गुणोत्तर राखले पाहिजे.

15. सहकारी साखर कारखान्यांनी कर्ज समभाग प्रमाण कमी करावे. साखर कारखान्यांनी स्वतःचे भांडवल वाढवले पाहिजे. सभासदांच्या ठेवी स्वीकाराव्यात.

16. किरकोळ साखरेची किंमत रु. 40 ते 45 प्रति किलो वर आणणे.

17. प्रति व्यक्ती साखरेचा वापर दर वर्षी 18 किलोपेक्षा जास्त वाढवण्याचा प्रयत्न करावे.

18. जीवनावश्यक वस्तू कायद्यातून साखर रद्द करण्यात यावी.

19. मोलॅसिस आणि साखरेवरील जीएसटी कमी करणे किंवा रद्द करणे.

20. साखरेच्या पुरेशा उत्पादनानंतर जास्तीत जास्त इथेनॉल उत्पादन करणे आवश्यक आहे.


21. NSI/वैकुंठभाई मेहता इन्स्टिट्यूट ऑफ कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट, पुणे येथे प्रशिक्षण देऊन व्यवस्थापनामध्ये व्यावसायिकीकरण आणणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :** सहकाराची संकल्पना चांगली असली तरी त्याची अंमलबजावणी सुधारण्याची गरज आहे. सध्या काही सहकारी साखर कारखाने चांगले काम करत आहेत आणि त्यांनी त्यांची उत्कृष्ट कामगिरी दर्शवली आहे .परंतु बहुसंख्य सहकारी साखर कारखाने योग्य आणि आर्थिकदृष्ट्या कार्यरत नाहीत. तेही सहकार क्षेत्रातील साखर कारखाने असून त्यांनी आदर्श बनून इतरांनाही आदर्श होण्याचा मार्ग दाखवणे ही काळाची गरज आहे. सहकारी साखरकारखाने खाजगीकरण करणे म्हणजे सहकारी साखर कारखाना बंद करून एक प्रकारची तडजोड केली जात आहे. सध्या सहकारी साखर कारखाने दुष्ट वर्तुळात आहेत आणि अशा विषम दुष्ट वर्तुळातून बाहेर आणणे, सहकारी साखरेचे व्यावसायिक व्यवस्थापन हा जगण्याचा एक उपाय आहे. यापुढे व्यावसायिक व्यवस्थापन, खर्च कमी, योग्य नियोजन, कार्यक्षम व्यवस्थापन, कमीराजकीय आणि सरकारी हस्तक्षेप, झटपट निर्णय, प्रभावी स्टोअर, साखरेची फॉरवर्ड मार्केट, एकूण गुणवत्ता व्यवस्थापन इत्यादी संकल्पना साखर कारखाना व्यवस्थापनामध्ये वापरल्या पाहिजेत, जरी व्यवस्थापन सहकारी स्वरूपाचे असले तरी. सहकारी साखर कारखान्यांनी जागतिकीकरणा संकल्पनेचा सामना करण्यासाठी नवीन विचार घेऊन पुढे यावे.

# कवयित्री शांता शेळके



महाराष्ट्राच्या साहित्यिक विश्वात कवयत्री शांता शेळके यांच नाव सबंध महाराष्ट्राला परीचित आहे. १२ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस शांता शेळके यांच पूर्ण नाव शांता जनार्दन शेळके जनार्दन शेळके यांच्या पोटी १२ ऑक्टोबर१९२२ रोजी पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे त्यांचा जन्म झाला. हुजुरपागा शाळा व स.प.महाविद्यालय पुणे येथे त्यांचे शिक्षण झाले. नागपुर येथे हिस्लॉप महाविद्यालय, मुंबई येथील रुईया, महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी मराठीच्या अध्यापिका म्हणून काम पाहिले. त्यांनी आचार्य अत्रे यांच्या नवयुग साप्ताहिक मध्ये उपसंपादकाची जबाबदारी सांभाळली स्तंभलेखन,मुलाखती, इंग्रजी लेखनाचे अनुवाद ,सभेचे वृतांत, पुस्तक परीक्षण,लेखन त्यांनी केले. कवयित्री, पत्रकार, प्राध्यापक, संगितकार, लेखिका, अनुवादक, बालसाहित्य लेखिका, संपादीका म्हणून साहित्यिक विश्वात ठसा उमटवला. १९७६ मध्ये आळंदी येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना संधी मिळाली. कथा, कविता, कादंबर्या लिहून त्यांनी साहित्यविश्वात आपले नाव कोरले. वर्षा, जन्मजान्हवी, तोच चंद्रमा, कळ्यांचे दिवस, फुलाच्या राणी, गोंदण, कविता संग्रह तर स्वप्नतरंग, ओढ, विझती ज्योत, कांदबर्या, मुक्ता, गुलमोहोर कथासंग्रह,पाऊसाआधिचा पाऊस ललितसंग्रह यासह भरपूर



साहित्यावर त्यांनी विपुल प्रमाणात लेखन केले आहे. शांता शेळके यांची गाणी आजही रसिकांच्या ओठांवर अधिराज्य गाजवत आहेत. त्यांची गाणी अजरामर ठरली आहे.

शांता शेळके यांनी मराठी चित्रपट सृष्टीतला असंख्य गाणी दिली. खरोखर शांता शेळके या ख्यातनाम कवयित्री महाराष्ट्राला लाभल्या. हे मोठे भाग्यच म्हणावे लागेल.शांताबाईना विविध पुरस्कार प्राप्त झाले आहे.गदीमा गीतलेखन पुरस्कार,केंद्र सरकारचा उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार, यशवंतराव प्रतिष्ठानचा पुरस्कार त्यांना मिळाला. लता मंगेशकर, आशा भोसले, किशोरी आमोणकर या सर्वगुणसंपन्न गायिकांनी त्यांच्या काव्यात्मक रचना गायल्या. मुंबई परळ येथील महर्षी दयानंद महाविद्यालयात त्या निवृत्त झाल्या. त्या पुणे येथेच स्थायिक झाल्या. ६ जून २००२ रोजी पुणे येथे कर्करोगाच्या आजाराने त्यांचे निधन झाले आणि ऐका प्रतिभासंपन्न, ख्यातनाम कवयित्रीला आपण मुकलो. त्यांचे साहित्य आज देखील आवडीने साहित्य रसिक आवर्जून वाचतात. जीवनगाणे गातच रहावे, शुर आम्ही सरदार,मी डोलकर डोलकर, वादळ वारं सुटलं गं, शारद सुंदर चंदेरी राती, गजानना श्री गणराया, गणराज रंगी नाचतो. अशी कितीतरी अजरामर गीते रसीक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत आहेत. शांता शेळके हे नाव साहित्यिक विश्वात अजरामर आहे. १२ऑक्टोबर त्यांच्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन....!

संतोष दत्तू शिंदे
मु.पो. काष्टी,
जि. अहमदनगर
मो. ७७२१०४५८४५



# ॲड. माधव जाधव यांची घाटनांदूर येथील पीडित मेंढपाळास मदत

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** तालुक्यातील घाटनांदुर येथे सोमवारी सकाळी अचानक १६ मेंढ्या मृत पावल्या. येथील मेंढपाळ शंकर दगडू वैद्य हे आपल्या मेंढ्या चारण्यासाठी शेताकडे नेत असताना गावाच्या बाहेरील गायरनात अज्ञाताने विकृत मानसिकतेतून विषारी पदार्थ मिसळून अन्नपदार्थ व भाकरीचे पसरवून टाकले होते. हे अन्नपदार्थ व भाकरीचे तुकडे मेंढ्यांनी खाल्ल्याने विषबाधा झाली. अवघ्या तासाभरात मेंढ्या तडफडू लागल्या; एक एक मेंढी तडफडून प्राण सोडून देत होती. माणसाच्या विकृत मानसिकतेमुळे मुक्या प्राण्यांना आपला जीव गमवावा लागला. एकूण १६ मेंढ्या मृत पावल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बी एल गायकवाड, डॉ. सुदर्शन मुंडे डॉ. बोने, डॉ. जावळे व नेमाने यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि वेळीच उपचार केल्याने उर्वरित मेंढ्यांना वाचवण्यात त्यांना यश आले आहे.

अचानक सोळा मेंढ्या मृत पावल्याने मेंढपाळ शंकर दगडू वैद्य यांचे जवळपास अडीच तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या दुर्घटनेमुळे पीडित मेंढपाळ मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून त्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी किसान काँग्रेसचे मराठवाडा अध्यक्ष ॲड. माधव जाधव यांनी येथील तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तसेच ॲड माधव जाधव यांनी शंकर वैद्य यांच्या घरी भेट देऊन त्यांना पंधरा हजार (१५०००/-) रुपयांची आर्थिक मदत करून आधार दिला. यावेळी ॲड.माधव जाधव यांचे सोबत रामभाऊ वैद्य, धनंजय जाधव, संजय रानभरे, रतन मोती व पिंटू गाढवे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. परळी मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी अद्याप पर्यंत शंकर वैद्य यांच्याकडे दुर्लक्ष केलेले असताना किसान काँग्रेसचे मराठवाडा अध्यक्ष तथा काँग्रेस पार्लमेंटरी बोर्ड सदस्य ॲड.माधव जाधव यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आर्थिक मदत दिल्यामुळे शंकर वैद्य यांच्या कुटुंबीयांना फार मोठा आधार मिळाला आहे.

## दीड लाख महिना खर्चूनही अंबाजोगाई अंधारात

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई नगर परिषदच्या वतीने शहरातील पथदिवे बंद चालू करण्याचे लाखो रुपयांचे टेंडर निघते ते टेंडर सत्ताधाऱ्यांच्या मर्जीतील लोकांना मिळत असल्यामुळे पूर्ण शहर अंधारमय होत आहे. सध्या अंबाजोगाई नगरपरिषदवर प्रशासक असल्यामुळे मनमानी कारभार सुरू आहे. यावर कुठेतरी अंकुश म्हणून मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित टेंडर धारकाला समज देण्याची तरी हिम्मत करावी. एवढीच अपेक्षा लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने करण्यात येत आहे. अन्यथा यापुढे जर शहरातील पथदिवे बंद आढळले तर त्या पोलला मुख्याधिकारी यांची प्रतिमा लावून पूजन करण्यात येईल. असा इशारा लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने देण्यात येत आहे. याची प्रशासनाने नोंद घ्यावी असे आवाहन लोकजनशक्ती पार्टीचे मराठवाडा अध्यक्ष राजेश व्हावुळे यांनी केले आहे.






# वकिलांनी विश्वासार्हता टिकवली पाहिजे : ॲड. वसंतराव साळुंके

## ॲड. अजित लोमटे यांच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** वकिली व्यवसाय करताना पथ्य पाळून सर्वसामान्य पक्षकाराला न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करून आपली विश्वासहर्ता टिकवली पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र व गोवा वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. वसंतराव साळुंके यांनी केले.

अंबाजोगाई येथील विधीज्ञ ॲड. अजितराव लोमटे (नवाब) यांच्या नूतन कार्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी उद्‌घाटक म्हणून ॲड. वसंतराव साळुंके बोलत होते. या उद्‌घाटन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून मा.आ.संजयभाऊ दौंड, मा.नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, मा.आ.पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड.शरदराव लोमटे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.किशोर किरवलकर, ॲड.सुधाकर चिखलीकर, ॲड.विक्रम खंदारे सरकारी विधीज्ञ ॲड.अशोक कुलकर्णी, ॲड.संजय लोहिया, ॲड.विष्णुपंत सोळंके, औरंगाबाद उच्च न्यायालयाचे ॲड.सुदर्शन साळुंके, प्रा.नानासाहेब गाठाळ, गिरधारीलाल भराडिया आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

आपल्या उद्‌घाटनपर विस्तारित भाषणात ॲड. वसंतराव साळुंके यांनी वकिली व्यवसाय करताना काय पथ्य पाळले पाहिजे. याचे मार्गदर्शन करून ज्येष्ठ विधीज्ञ कै.अण्णासाहेब लोमटे यांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देऊन ॲड.अण्णासाहेब लोमटे (नवाब) यांच्या कार्याचा वारसा ॲड. अजित लोमटे समर्थपणे चालवीत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. चांगले कार्य करणाऱ्या वकिलावरच टीका होत असलेमुळे डगमगून न जाता निष्ठेने आपण पुढे चालले पाहिजे. मी पक्षकाराबरोबर नीट वागत नसल्याचा आरोप होतो, पण पक्षकाराकडून सविस्तर माहिती घेण्यासाठी कधी कधी नीट न बोलता अधिक माहिती मिळू शकते. न्यायव्यवस्थेवर विश्वास राहिला नाही, सर्वसामान्यांना स्वतःमध्ये न्याय मिळाला पाहिजे असे मत व्यक्त झाले, या प्रश्नावर राजकीय पक्ष व्यक्ती किती जबाबदार आहे हे देखील तपासून घेण्याची गरज आहे. प्रत्येक गोष्टी महाग होत असताना फक्त वकिलांच्या फी बद्दल बोलणे योग्य होणार नाही. याप्रसंगी ॲड. किशोर गिरवलकर, डॉ.नरेंद्र काळे, राजकिशोर मोदी, मा.आ.संजय दौंड, मा.आ.पृथ्वीराज साठे, ॲड. शरदराव लोमटे, प्रा.नानासाहेब गाठाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी ज्येष्ठ विधीज्ञ कै.अण्णासाहेब लोमटे यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. अजित लोमटे (नवाब) यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगद तट सर यांनी तर आभार प्रदर्शन नगरसेवक बबन लोमटे यांनी केले. कै.ॲड. अण्णासाहेब लोमटे (नवाब) कॉम्प्लेक्स मध्ये झालेल्या कार्यक्रमास दाजीसाहेब लोमटे, प्राचार्य संतोष भोसले, उद्योजक बाबासाहेब शिंदे, सुनील लोमटे, आनंद लोमटे, राजेसाहेब लोमटेंसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे-नागपूर मार्गावर धावणार जादा 'शिवनेरी'

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दिवाळीत प्रवाशांची मागणी लक्षात घेता राज्य परिवहन महामंडळाकडून (एसटी) पुणे-नागपूर मार्गावर १९ ऑक्टोबरपासून शिवनेरी व्हॉल्व्हची जादा फेरी सोडण्यात येणार आहे. एसटीच्या वाकडेवाडी येथील स्थानकातून ही गाडी सोडण्यात येणार आहे. पुणे आणि नागपूर या दोन्ही बाजूने २३ ऑक्टोबरपर्यंत जादा गाडी धावणार असल्याचे एसटीच्या पुणे विभागाकडून सांगण्यात आले. दिवाळीमध्ये पुण्यातून सर्वाधिक मागणी विदर्भात जाण्यासाठी असते. त्यात नागपूर आणि अमरावती भागांत जाणारे प्रवासी सर्वाधिक असतात. दिवाळीच्या कालावधीत काही खासगी वाहतूकदार मनमानी पद्धतीने भाडेवसुली करीत असल्याच्या तक्रारीही दरवर्षी होतात. प्रवाशांची मागणी लक्षात घेता एसटीकडूनही जादा गाड्या उपलब्ध करून देण्यात येतात.

## डॉ. किरण डावळेंची सहयोगी प्राध्यापकपदी नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** मुळ अंबाजोगाईचे रहिवासी व सध्या लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सहायक



प्रा.डॉ. किरण अरुणराव डावळे यांची महाराष्ट्र लोक सेवा आयोगामार्फत औषधशास्त्र (मेडिसीन) विभागाच्या सहयोगी प्राध्यापकपदी नियुक्ती झाली आहे. डॉ. किरण डावळे हे स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे तत्कालिन अधिष्ठाता कै.व्यंकटराव डावळे यांचे नातू व प्रसिध्द सर्जन डॉ. अरूण डावळे यांचे सुपुत्र आहेत. काल बुधवार दि.१२ रोजी लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यात डॉ.किरण यांची औषधशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापकपदी नियुक्ती झाली. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# वडशिंगी येथील तरुणाचा डोहात बुडून दुर्दैवी मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** तालुक्यातील वडशिंगी येथील वीस



वर्षीय ऋषिकेश संजय तायडे हा युवक आपल्या स्वतःच्या बकऱ्या घेऊन गावा नजीक असलेल्या बेंबळा नदी परिसरामध्ये बकऱ्यांना चारण्याकरिता घेऊन गेला होता. बकऱ्या चारण्याकरीता गेला असताना त्याच्याजवळील एक बकरीचे पिल्लू नदीपात्रात गेल्याने त्या पिल्लाला वाचवण्याच्या प्रयत्नात ऋषिकेश याचा तोल गेल्याने पंधरा फूट खोल डोहात पडल्याने पोहता येत नसल्यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक 12 ऑक्टोबर रोजी दुपार दरम्यान घडली. सदर घटनेची माहिती मिळताच गावातीलच नागरिकांनी बेंबळा नदी मधील डोहामध्ये उड्या घेऊन ऋषिकेश याला बाहेर काढले व मोटरसायकलवर त्याला जळगाव जामोद येथील ग्रामीण रुग्णालयात उपचाराकरिता आणले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. सदर घटनेची फिर्याद त्याचा चुलत भाऊ वसंत भास्कर तायडे वय 36 वर्ष यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशनला दिली असता घटनेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन सदर मृतक ऋषिकेश याच्या मृतदेहाचा पंचनामा केला. शवविच्छेदन करून मृत ऋषिकेश याचे शव कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. सदर मृतक ऋषिकेश तायडे याला आई-वडील व एक बहीण असून मृतक ऋषिकेश हा घरात त्यांचा मोठा मुलगा होता.

# मंठ्यात रंगले आविष्कारचे कविसंमेलन, रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद...!

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** येथील आविष्कार साहित्य मंडळाच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या निमंत्रितांच्या कविसंमेलनात कवी अनंत राऊत यांच्या दुःख अडवायला उंबऱ्यासारखा मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा या कवितेने रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. कवी धम्मपाल जाधव, निलेश चव्हाण, अविनाश भारती या निमंत्रित कविंच्या विनोदी शैलीत प्रितीप्रेमाच्या काव्याबरोबरच राजकीय व्यंगावर बोट ठेवणाऱ्या कवितांनी काव्यरसिकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले. कार्यक्रमारंभी शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व ग्रंथ पूजनाने उदघाटन सोहळा पार पडला. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव राजेश मोरे,व डॉ. प्रवीण माळेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचा व निमंत्रित कविंचा शाल, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केल्यानंतर मंडळाचे अध्यक्ष डॉ.धोंडोपंत मानवतकर यांनी आविष्कार साहित्य मंडळाची भूमिका स्पष्ट करणारे मनोगत व्यक्त केले. साहित्य मंडळाचे सदस्य प्राचार्य कुं.पी. इंगळे व हरिराम तिवारी या ज्येष्ठ सभासदांचा आविष्कार जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान केला. बी.रघुनाथ पुरस्काराचे मानकरी ठरलेले प्रा.डॉ. सदाशिव कमळकर, व प्रा.डॉ.अशोक पाठक यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्‌घाटकीय भाषण करतांना शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे पाटील म्हणाले की, आविष्कार साहित्य मंडळाने अनेक वर्षापासून साहित्यिक व सांस्कृतिक वारसा जपून ठेवला आहे. आविष्कारचा हा आदर्श पुढील पिढीने घेतला पाहिजे. व तो



चालवण्यासाठी ही चळवळ पुढे नेली पाहिजे. तर भाजपा किसान मोर्चाचे सचिव राजेश मोरे यांनी आविष्कार साहित्य मंडळाच्या कारकिर्द तीस वर्षापासूनची आहे, साहित्याची चळवळ चालवणे अत्यंत कठीण काम आहे. आविष्कारने मंठ्यासारख्या ठिकाणी ही चळवळ टिकवून ठेवली आहे त्यांचे कौतुक करण्यापेक्षा हा कार्यक्रम अखंड चालू राहण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची गरज आहे. असे उपस्थितांना आवाहन केले. पहिल्या सत्राचे सूत्रसंचालन प्रा.शोभा डहाळे यांनी केले. मान्यवरांच्या भाषणानंतर लगेच कविसंमेलनाला सुरुवात झाली. या कविसंमेलनासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध तरूण कवी अनंत राऊत, निलेश चव्हाण, अविनाश भारती आणि धम्मपाल जाधव यांना निमंत्रित करण्यात आले होते. येथील अविष्कार साहित्य मंडळाच्या वतीने पौर्णिमा कवितेची हे निमंत्रितांचे कविसंमेलन जिल्हा परिषदेच्या प्रांगणात कोजागरीच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही घेण्यात आले होते. उशिरापर्यंत सुरू असलेल्या कविसंमेलनात कविंनी चांगलाच रंग भरला. एकापेक्षा एक अशा सरस कविता सादर होताना काव्यरसिकांनीही मनमुराद दाद दिली. कवी अनंत राऊत यांच्या ***दुःख अडवायला उंबऱ्यासारखा मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा वाट चुकणार नाही जीवनभर तुझी एक तू मित्र कर आरशासारखा आत्महत्याच करणार नाही कुणी मित्र असला जवळ जर मनासारखा चालताना मध्ये रात आली कधी मित्र येतो पुढे काजव्यासारखा'*** या कवितेने रसिक मंत्रमुग्ध झाले. परळीचे कवी अविनाश भारती यांच्या ***तुझ्या नाजूक हातात सखे, चुडाही नाजूक, माझी नजर भावूक, त्याला सारेच ठावूक'*** ही कविता श्रोत्यांना भावुक करून गेली. औरंगाबाद येथील आकाशवाणीचे निवेदक व कवी धम्मपाल जाधव यांनी कमाल आहे वर्षांनुवर्षे माझ्या बाच्या गळ्यात फाटकाच रुमाल आहे. शेतकऱ्यांच्या दयनीय वास्तवाचे चित्रण करणाऱ्या या कवितेने रसिकांच्या काळजाचा ठाव घेत मैफिलीला रंग भरला. कवी निलेश चव्हाण यांनी ती ***एक दिवाळी होती, सगळे सोबत असायचे, चेहरे ते वेगळे जरी 'सगळे सारखे दिसायचे'*** या कवितेने भूतकालीन परिस्थितीची जाणीव करून देत वर्तमान परिस्थितीत माणूस कसा बदलत जातोय याबाबतची तफावत व्यक्त करणारे वास्तव मांडले. अकोला येथील कवी अनंत राऊत यांच्या ***'भोंगा वाजलाय, भोंगा वाजलाय नेता गाजलाय, नेता गाजलाय*** 'या कवितेने राजकीय व सामाजिक व्यंगावर घाव घालत रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळवली. ज्या कवितेने त्यांची ओळख आहे ती कविता सादर करण्याचा रसिकांनी आग्रह धरला होता. ***मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा*** या कवितेने कार्यक्रमाची सांगता झाली. रसिकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन प्रा. प्रदीप देशमुख यांनी केले. मंठा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख व त्यांच्या सर्व पोलिस सहकाऱ्यांच्या वतीने श्रोत्यांसाठी कोजागिरीच्या दुधाची खास व्यवस्था केली होती. शेवटी मंडळाच्या सदस्या सौ.मंजुषा काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष डॉ. धोंडोपंत मानवतकर, डॉ. संतोष मोरे, प्राचार्य के.पी. इंगळे, शिवाजी जाधव, प्रा. डॉ. सदाशिव कमळकर, पी.टी प्रधान, ओमप्रकाश राठोड, बाबुजी तिवारी, प्रा. शोभा डहाळे, मंजुषा काळे, प्रदीप इक्कर, विजय गायकवाड, शत्रुघ्न तळेकर, सतीश खरात, शुभम उबाळे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास परिसरातील बहुसंख्य रसिकांची उपस्थिती होती.

# कोजागिरीसाठी गेलेल्या कुटुंबीयांचे घर फोडले

आधुनिक केसरी न्यूज

**औंढा नागनाथ :** येथे कोजागिरी पौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी गेलेल्या एका चाकरमान्याचे घर चोरट्याने फोडले. या घरातून रोख रक्कमेसह, सोने, चांदीचे दागिने असा एकुण २ लाख २५ हजाराचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला आहे. या प्रकरणी पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अशी माहिती एपीआय शेषराव खटाने यांनी दिली.पण पोलिस निरीक्षक दिलीप गांगुर्डे यांनी कोणताही गुन्हा दाखल नसून एकदम शांतता आहे असे सांगितले. हा प्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर गेला असता.त्यांनी आश्चर्य व्यक्त केले.

मनोज केशवराव पहाडे (वय ५४, रा. देवगिरी हिल्स, शिवाजीनगर) असे फिर्यादीचे नाव आहे. ते पत्नसहित ८ ऑक्टोबरला घराला लॉक लावून औंढा नागनाथ येथील कोजागिरी पौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी गेले होते. सदर कुटूंब ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वा.परतले असता,त्यांच्या लक्षात आले की, घराचे कुलूप तुटलेले होते. घरात गेल्यानंतर ३२ इंच टिव्ही, सह घरातील कपाटामध्ये ठेवलेले २० ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, २ पेले, २ पळ्या, ३ गणपतीच्या मुर्त्यां, ३ पायातील जोडवे, चांदीचे शिक्के असा २ किलो चांदीचे साहित्य, तसेच पाच हजार रूपये रोख असा एकुण २ लाख २५ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# विद्यार्थ्याला टवाळखोरांनी मारहाण करत लुबाडले

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अल्पवयीन विद्यार्थ्याला आज दुपारी अडीच वा. दशमेशनगर परिसरात चार टवाळखोरांनी अंगावर श्वान सोडून मारहाण केली. त्याच्या खिशातील ४००रु.हिसकावले. या प्रकरणी उस्मानपुरा पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. तर तिसऱ्या आरोपीला नोटीस देत कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले. अशी माहिती पोलिस निरीक्षक गिता बागवडे यांनी दिली. तन्मय सतीश जाधव (१९) विशाल उत्तमसिंग चंदवाडे(२०) दोघेही रा. मित्रहार कॉलनी जवाहरनगर,अशी अटक आरोपींची नावे आहेत. तर विवेक संतोष तारके (१९) रा. शिवाजीनगर असे नोटीस बजावलेल्या आरोपीचे नाव आहे. अन्य चौथा आरोपी फरार आहे. या प्रकरणात रौनक शरद बाविस्कर(१६) रा.मिटमिटा हा फिर्यादी आहे. वरील टवाळखोरांनी रौनकला केलेली मारहाण फूड ट्रकच्या सी.सी.टिव्हीते कैद झाली आहे. रौनक हा देवगिरी महाविद्यालयात ११ वी सायन्सचे शिक्षण घेतो. तो फूड ट्रकवर जेवण घेत असताना दुपारी वरील टवाळखोरांनी त्याला मारहाण करत लूटले व गोपाल टी जवळील टपरीवर सिगारेट ओढत बसले होते. दरम्यान फूड ट्रकचा मालक शुभम याने रौनकला ताबडतोब उस्मानपुरा पोलिस ठाण्यात आणून रितसर तक्रार दिली. पोलिस निरीक्षक बागवडे यांनी ताबडतोब पीएसआय प्रविण वाघ यांना वरील टवाळखोरांना शोधण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलिस उपनिरीक्षक वाघ यांना खबऱ्याने वरील टवाळखोर गोपाल टी जवळ असल्याचे वरील आरोपींना अटक केली. पुढील तपास पीएसआय प्रविण वाघ करंत आहेत.

# सावळदबारा येथे बिबट्याच्या हल्ल्यात वासरू जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील एका शेतकऱ्याच्या शैलेश राजेंद्र जैस्वाल यांच्या गाईच्या वासराला वन्यप्राण्याने गंभीर जखमी केले आहे. परिसरात वन्यप्राण्याच्या पायाचे ठसे आढळल्याने याची माहिती वनविभागाला सागर जैस्वाल यांच्या कडून देण्यात आली. बुधवारी वन्य प्राण्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या वासराची तपासणी करताना दि.१२/२०/२२ रोजी सावळदबारा वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन जखमी वासराची पाहणी केली. सावळदबारा येथील शेतकरी राजेंद्र जैस्वाल यांच्या मालकीच्या मधील शेतात दिवशा चरण्यासाठी गेलेल्या वासराला बिबट्या वन्यप्राण्याने जखमी केले. वनविभागाचे कर्मचारी, आणि वनमजुर यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळ बिबट्या असल्याचा संशय व्यक्त करण्यात



आला. शेतवस्त्यांवर पाळीव कुत्री, बकऱ्या, कोंबड्या, गायी, म्हैशींची सहज शिकार मिळत असल्याने बिबटे मानवी वस्त्यांकडे आकर्षिले जात असल्याचे सांगितले जाते.उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान यांनी सांगितले.जाईचादेव डोंगरावर बिबट्या व अस्वल असल्याची चर्चा सर्वत्र आहे. या परिसरात बिबट्याचा वावर असल्याने नागरिकांनी सावध रहावे, रात्रीवेळी शेतकऱ्यांनी शेतात सावधगिरी बाळगावी असे वनविभागाचे वनरक्षक सुनील खरोदे यांनी सांगितले.

# किमान वेतनाच्या मागणीसाठी आयटकची पदयात्रा

## अधिष्ठातांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी !

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कथित कंत्राटी कामगारांच्या हक्काचे किमान वेतनाच्या फरकाची रक्कम दाबुन ठेवणाऱ्या व आठवडी सुट्टी न देणाऱ्या अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद यांच्यावर गुन्हा दाखल करा या मागणीसाठी महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटना संलग्न आयटक तर्फे घाटी हॉसापीटल ते सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय पदयात्रा काढुन ठीय्या आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटना संलग्न आयटकचे सभासद असलेल्या कामगारांनी गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने शांततामय मार्गाने, लोकशाही मार्गाने हक्काच्या किमान वेतनाच्या फरकाची रक्कम कथित कंत्राटी कामगारांना त्यांच्या बँक खात्यात अदा करण्यात यावी, या मागणीसाठी निवेदने दिलेली आहेत. अधिष्ठाता यांनी जवळपास साडेबारा लाख रुपये कपात करून ठेवल्याचेही कळाले आहे. परंतू सदर रक्कम अजुनही मुद्दामहून कुबुद्धीने कामगारांच्या खात्यात अधिष्ठाता वर्ग करीत नाहीत; उटल



खोट्या-नाट्या तक्रारी करून शांततामय मार्गाने चाललेले आंदोलन चिघळवीण्याचा प्रयत्न करीत आहेत. याचा आम्ही तीव्र निषेध करतो असे आयटकने निवेदनात म्हटले आहे. अधिष्ठाता यांनी कितीही चिथावण्या दिल्या तरीही आंदोलन शांततामय मार्गाने सुरुच राहील, आजपर्यंत आम्ही संयमाने अधिष्ठाता यांना सहकार्य केले परंतू कामगारांचे वेतन रोखण्यामागे अधिष्ठाता याच आहेत, याची संपूर्ण खात्री झाल्यामुळे सहाय्यक कामगार उपायुक्त कार्यालयापर्यंत रोज पदयात्रा काढण्याची वेळ येणार नाही, अशी अपेक्षा आहे असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनात १) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालय औरंगाबाद येथिल कथित कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनाच्या फरकाची रक्कम दाबून ठेवणाऱ्या अधिष्ठाता यांच्यावर कायदेशिर कारवाई करा, गुन्हे दाखल करा. २) कथित कंत्राटी कामगारांची कबुल केलेली सेवा ज्येष्ठता यादी पारित करण्याचे आदेश अधिष्ठाता यांना द्या. ३) कथित कंत्राटी कामगारांना आठवडी सुट्टी न देणाऱ्या अधिष्ठाता यांच्यावर कायदेशिर कारवाई करा, गुन्हे दाखल करा इ मागण्यांचा समावेश आहे. सहाय्यक कामगार आयुक्त चंद्रकांत राऊत व यु एस पडीयाल यांनी निवेदन स्विकारले. दुपारी 4 वाजता सहाय्यक कामगार उपायुक्त कार्यालयात अधिष्ठाता यांना युनियनशी चर्चा करायला बोलावण्यात आले, अधिष्ठाता नेहमीप्रमाणे आल्या नाही , उपअधिष्ठाता डॉ काशिनाथ गरकल, डॉ विकास राठोड हे आले. चंद्रकांत राऊत यांनी कीमान वेतन दिले जाते की नाही हे पाहण्याची जबाबदारी मुळ मालकाची आहे असेही सांगीतले. कीमान वेतन हे 12800/- रुपये आहे आणि कामगारांना जास्तीत जास्त दरमहा 8000/- रु दिलेले आहेत असे राऊत यांच्या निदर्शनास आणण्यात आले. दोन दिवसात कामगारांच्या खात्यात कीमान वेतनाच्या फरकाची रक्कम देण्यात आली नाही तर घाटी ते कामगार उपायुक्त कार्यालय रोज 4 कामगार पदयात्रा काढुन निवेदन देतील. दोन दिवसात कामगार उपायुक्तांनी अधिष्ठातावर गुन्हा दाखल केला नाही तर या पदयात्रा करण्यात येतील. यावेळी ॲड. अभय टाकसाळ, अभिजीत बनसोडे, दिपक मगर, गौतम शिरसाठ, निलेश दिवेकर, श्रीयोग वाघमारे, नंदा हिवराळे, मनीषा हिवराळे, संगीता सिरसाट, कविता जोगदंडे, आम्रपाली जोगदंडे, अरूणा वाहुळ, सुनिता म्हस्के, ज्योती खरात, सविता घागरे, वनिता वाहुळ, वनिता जाधव, सुनंदा दांडगे, पंचशीला मोरे, अंजुम शेख,उषा कांबळे, ऊषा साबळे, अनिता वाघ, गौसीया शेख, उज्ज्वला वाघमारे, मनिषा सातपुते, वनिता सातदीवे, बैबी काकडे, प्रमीला रत्नपारखे, अजहर शेख यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते.

# अजिंठा येथील तत्कालीन ग्रामसेवकाच्या चौकशीप्रकरणी वरिष्ठांचे हात ओले

## चौकशीत दोषी आढळूनही सक्त ताकीद देऊन ग्रामसेवकास भ्रष्टाचार करण्यास अभय

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** येथील तत्कालीन ग्रामसेवक जी.एन. सैवर यांची विविध प्रकरणात चौकशी व्हावी या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते संदीप मानकर यांनी डिसेंबर 2020 मध्ये गटविकास अधिकारी, पंचायत समिती सिल्लोड व मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. औरंगाबाद यांना तक्रार केली होती. तब्बल 2 वर्षे चौकशी चा सोपस्कार पूर्ण करून चौकशीत दोषी आढलेल्या ग्रामसेवकास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सक्त ताकीद देऊन दोषमुक्त केले आहे. यामुळे या प्रकरणात वरिष्ठांचे च हात ओले झाले असल्याचा संशय बळावला आहे. सर्व सामान्य जनतेने केलेल्या तक्रारींच्या चौकशीला दोन-दोन वर्षे लागून कर्मचारी निर्दोष सुटत असतील तर वरिष्ठ अधिकारीच भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असून कर्मचाऱ्यांना



ग्रामसेवक जी.एन. सैवर



भ्रष्टाचार करण्यास रान मोकळे करून देत आहे व शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारायला भाग पाडत आहेत. बेकायदेशीर ठराव घेणे, खोटे दस्ताऐवज तयार करणे, शौचालयाचे दुबार अनुदान वाटप करणे, दुष्काळात टँकर ची अफरातफर करणे, माहिती अधिकाराखाली मागितलेली माहिती देण्यास नाकारणे असे अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून आणि ते सिद्ध झालेले असून सुद्धा वरिष्ठांनकडून होणाऱ्या फक्त सक्त ताकीद या थातूर-मातूर कार्यवाहीने संशयाला जागा करून दिली आहे. वरिष्ठांचेच भ्रष्टाचाराला अभय असल्याने स्वराज्य संस्थेत भ्रष्टाचार बोकाळल्याचे चित्र चोहीकडे पाहायला मिळत आहे.

**या प्रकरणात मा .लोकआयुक्त यांच्याकडे दाद मागणार**
ग्रामसेवक जी .एन . सैवर यांच्या भ्रष्टाचार प्रकरणी वरिष्ठांची कार्यवाही संशयास्पद असून या लाखो रुपयांच्या भ्रष्टाचारात वरिष्ठ अधिकारीही सामील आहेत . या प्रकरणी मी लोकआयुक्त यांच्याकडे दाद मागणार आहे . कारण माझा न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे आणि ते सिद्ध झालेला भ्रष्टाचार कधीच खपवून घेणार नाही याची मला पूर्णपणे खात्री आहे .
**संदीप मानकर**, पत्रकार तथा जिल्हाध्यक्ष, मातंग एकता आंदोलन



**वर्ग 1 च्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी** :या प्रकरणात तक्रार दिल्या नंतर अनेक महिने टाळाटाळ करीत खुलताबाद पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री .कहाटे यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली . तद्नंतर गट विकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत चौकशीला बोलावल्या नंतर ही अनेक सुनावनीला गैरहजर राहून ग्रामसेवक सैवर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना जणूकाही ठेंगाच दाखविला . शेवटी सर्व प्रकरणात सैवर यांना दोषी मानून आर्थिक चिरी–मिरी घेत वरिष्ठांनी सर्वसामान्यांना न्याय किती दुरापास्त आहे हे दाखवणारी फक्त आणि फक्त सक्त ताकीद नावाची शिक्षा दिली . म्हणजे आर्थिक चिरी–मिरीच्या भरवशावर निकाल हा आपल्या कर्मचाऱ्याला वाचविण्यासाठी त्याच्या बाजूनेच दिला जातो आणि आम्ही वरिष्ठच या भ्रष्टाचाराला खतपाणी घालतो, शासनाची तिजोरी म्हणजे आमची हक्काची वास्तूच आहे असेच चित्र या निकालातून पाहायला मिळत आहे .



# मुलीच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्यांवर कठोर कारवाई करावी : वनिता पिंपळे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील पाणपोई परिसरातील बहिरगाव डोणगाव रस्त्यावर टॅक्टरच्या धडकेत शाळकरी मुलीचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक करणाऱ्या जेसीबी- टॅक्टरच्या चालक, मालक तसेच जागा मालकांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते यांच्याकडे नातेवाईक व संघटनेने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, २३ सप्टेंबर रोजी बहिरगाव फाटा कमान येथे गौण खनिज मुरुमाची अवैध खोदकाम व वाहतुक राजरोसपणे सुरू होती, याठिकाणी मुरूमच्या जास्त ट्रीप मारण्याची जणू शर्यत लागल्याने एका गरीब कुंटुबातील शाळकरी मुलीचा बळी गेला. सदर घटनेला वीस दिवस झाले तरी अद्याप कारवाई मात्र संत गतीने सुरू आहे. गुन्हेगार मात्र मोकाट फिरताना दिसून येत आहे. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक करणाऱ्या जेसीबी- टॅक्टरच्या चालक, मालक तसेच जागा मालकांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा कठोर कारवाही करावी अन्यथा भिल्ल संघटना अंदोलन छेडणार. आता सदरील प्रकारणात थातुरमातुर कारवाही होती का ? मोठी कारवाही होऊन एक गरीब निरागस मुलीला न्याय मिळतो का अश्या चर्चा सुरू आहेत. ऐक मुरमाच्या ट्रॅक्टरला एक लाख वीस हजारा पर्यंत महसूल विभागाचा दंड होतो तर या अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या चार ते पाच जेसीबी 15 ते 20 ट्रक्टरांना किती दंड होणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. सदरील निवेदनावर छावा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष अरुण गायके, गौतम शिरसाठ, भिल्ल संघटनेचे शिवाजी गायकवाड, अंबादास मोरे, रामदास सोनवणे, एकनाथ गायकवाड, रामनाथ काळे, संतोष सोनवणे व इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीने केला आई- वडिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप बाबा खंडापूरकर लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती कोल्हापूर वतीने विभागीय अध्यक्ष धनंजय सराटे यांनी एक आगळा वेगळा कार्यक्रम घेऊन आई-वडिलांचा सत्कार असा आगळावेगळा कार्यक्रम आयोजित केला होता तसेच माऊली महिला ग्रह उद्योग समूहाचे उद्घाटन सोहळा तसेच गुणगौरव सोहळा तसेच घरगुती गणपती सजावटीचे बक्षीस वितरण सोहळा संपन् झाला. यावेळी प्रमुख पाहुणे सुजीतभाऊ चव्हाण, मा. प्रविण काकडे, शोभाताई बल्लाळ, डॉ. सुरेश राठोड, राजेश भोसले, गजानन कोले, अविनाश पाटील, मा.सागर शिपेकर, वसंतराव लिंगनूरकर,मा.दिगंबर तोरस्कर, बी.व्ही. शिंदे यांचा पण ठिकाणी शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच समाजिक कार्यात सदैव तत्पर असणारे अष्टपैलू व्यक्तीमत्वांचा याचां महेश घोरपडे, नौशाद शेख, सुरेश अतिग्रे, मेघा भोसले, चेतन गायकवाड, डॉ. अजित येलपले, प्रकाश पाटील, सचिन शिंदे यांचा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे वतीनी सत्कार करण्यात आला. समीर जमादार प्रदेश अध्यक्ष, पूजा शिंदे महिला जिल्हा अध्यक्ष, सौ. बागे उपजिल्हा अध्यक्ष, संजय कात्रट जिल्हाअध्यक्ष यांनी याप्रसंगी सर्व मान्यवरांचा सत्कार केला. यावेळी सुजित भाऊ चव्हाण (शिवसेना जिल्हाध्यक्ष), प्रवीणजी काकडे साहेब( ऑल इंडिया धनगर समाज महासंघ प्रदेशाध्यक्ष) सौ. शोभाताई बल्लाळ (राष्ट्रीय उपाध्यक्ष), अविनाश पाटील, राजेश भोसले (पोलीस मित्र दक्ष नागरिक), डॉ. सुरेश राठोड, गजानन कोल्हे, डॉ. बाबूराव घुरके, धनंजय सराटे साहेब (विभागीय अध्यक्ष) व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती जिल्हा अध्यक्ष संजय कात्रट यांनी दै.आधुनिक केसरीचे तालुका प्रतिनिधी गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले.



# लोकस्वराज्य आंदोलन वसमत तालुका युवक आघाडी अध्यक्षपदी नवनाथ गडंबे



आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** लोकस्वराज्य आंदोलन या सामाजिक संघटनेकडून संपूर्ण महाराष्ट्रात प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ॲड. दत्तराज गायकवाड प्रदेशाध्यक्ष युवक आघाडी, युवकआघाडीचे जिल्हाध्यक्ष अंकुशदादा गायकवाड यांच्या नेतृत्वखाली युवक जोडो अभियानांतर्गत युवक, युवती, महिला, पुरुष, कर्मचारी बांधवांना संघटनेत जोडण्याचे काम चालू आहे. हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुका युवक आघाडी अध्यक्षपदी नवनाथ गडंबे धडाडीचे कार्यकर्ते तथा तळमळीने समाजाचे प्रश्न सोडवणारे युवा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी संजय खिल्लारे, उमेश सूर्यवंशी, गोविंद गडंबे, रंगनाथ गडंबे, बंडू मोरे, के.व्ही. हळदे सर यासह अनेक आंदोलक यावेळी उपस्थित होते. वसमत तालुका युवक आघाडीच्या नुतन तालुकाध्यक्ष व पुढील कार्यकारणी आपल्या सोयीनुसार घेवून उपस्थितआंदोलकांनी अधिक जोमाने लोकस्वराज्य आंदोलन युवक जोडो अभियानात तन-मन-धनाने भाग घेवून हे समाजांचे काम पूर्ण यशस्वी करून, अधिकाधिक युवकांना लोकस्वराज्य आंदोलनाशी जोडण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी मोठ्या प्रमाणावर युवकांची संख्या होती. संपूर्ण युवकांची फळी येणाऱ्या काळात हिंगोली जिल्ह्यात निर्माण करण्याची ग्वाही यावेळी युवकांनी दिलेली आहे. हिंगोली जिल्ह्यात लोकस्वराज्य आंदोलनाचे काम मोठ्या प्रमाणात वाढविले जाईल, असे ही यावेळी युवकांनी आपल्या मनोगत सांगितले आहे.



# नावीन्यपूर्ण पीक म्हणून करडई व जवस प्रात्यक्षिक प्रयोग

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** परिसरात सध्या रब्बी कोरडवाहू पिक पेरणीसाठी महत्वाचा असा कालावधी आहे. कोरडवाहू शेतीसाठी उपलब्ध ओलाव्यावर पेरणी करत उगवण व्हावी असा दृष्टीकोन शेतकरी बांधवांचा असतो. त्यामुळे वेळेवर पेरणी करणे सर्वात महत्वाचे असते. पूर्वीप्रमाणे केवळ रब्बीसाठी कोरे क्षेत्र आता ठेवणे शक्य नाही, त्यामुळे खरीप मूग, उडीद, सोयाबीन, बाजरी, मका आदी पिक काढणीनंतर रब्बी पिक पेरणी करायाची झाल्यास उपलब्ध ओलावा जपत पेरणी केली तर पिकाची उगवणशक्ती चांगली होते. यासाठी खरीपाची पिके निघताच अगोदर तण काढणे महत्वाचे ठरते यासाठी फार खोलावर मशागत न करता तणे काढली तर जमिनीत असलेला ओलावा अबाधित राहतो याचा उपयोग रब्बी पिके येण्यासाठी होतो. कोरडवाहू रब्बी पिकाची १५ ऑक्टोबरपर्यंत पेरणी व्हावी जेणे




करून योग्य वेळेवर झालेली पीक पेरणी ही अपेक्षित उत्पादन देण्यासाठी उपयोगाची होईल. पेरणी करण्यापूर्वी बीजप्रक्रिया करणे महत्वाचे असते त्यानंतर पेरणीसोबत बेसल डोस देणे, योग्य अंतरावर पेरणी करणे जेणेकरून हेक्टरी रोपांची संख्या राखू शकतो. याकरिता रब्बी हंगाम सन २०२२ मध्ये सोयगाव तालुक्यातील दुर्गम भागात सावरखेडा व लेणापूर येथे कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा यांचे मार्फत करडई पिक प्रात्यक्षिक व कृषि विज्ञान केंद्र औरंगाबाद यांचे मार्फत जवस पिक प्रात्यक्षिक राबविण्यासाठी बियाणे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने तेलबिया क्षेत्र विस्तार करणे व तेल उत्पादन घेणे हा मुख्य उद्देश आहे.

आजच्या कार्यक्रमास कृषि विज्ञान केंद्र औरंगाबाद येथील प्रमुख शास्त्रज्ञ झाडे साहेब यांनी पिक लागवड अंतर, पेरणी वेळ व खत व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. यात प्रामुख्याने करडई पिकासाठी हेक्टरी बियाणे १२ किलो, अंतर 45 बाय 20 सेमी, खत मात्रा २०:२०:०० प्रति हेक्टरी देण्याची व जवस पिकासाठी हेक्टरी २५ किलो बियाणे वापरावे, (शिफारस तेलबिया संशोधन केंद्र लातूर) पेरणी अंतर 30 बाय 15 सेमी ठेवावे, खत मात्रा या पिकास नत्र व स्फुरद या खाताची समसमान गरज लागते हेक्टरी २५ किलो नत्र व २५ किलो स्फुरद देणेची शिफारस करण्यात आली. सदरील बियाण्याचे वितरण कृषि विज्ञान केंद्र औरंगाबाद येथील प्रमुख शास्त्रज्ञ झाडे साहेब, जिल्हा परिषद येथील मोहीम अधिकारी डि. के. गवळी, तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ, मंडळ कृषि अधिकारी जे. के. जाधव, कृषि सहाय्यक बी. आर. चौरे व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए. एस. महाजन यांचे हस्ते करण्यात आले. आजच्या कार्यक्रमास गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रगतिशील शेतकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.अशी माहिती कृषी सहायक हेमंत देशमुख सोयगाव यांनी बोलताना सांगितले.



# गलवाडा गावी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिर

आधुनिक केसरी न्यूज


**सोयगाव :** परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या तथा गलवाडा वेताळवाडीच्या ग्रामपंचायत सदस्या सौ.सुशिलाताई चंद्रकांत इंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात लायन्स नेत्र रुग्णालय चिकलठाणा व सुशिलाताई इंगळे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात 217 रुग्णांची तपासणी करण्यात आली तर 15 रुग्णांची चिकलठाणा येथील लायन्स नेत्र रुग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे.


या कार्यक्रमास सोयगाव नगरपंचायत नगराध्यक्ष आशाबी तडवी, उपनगराध्यक्ष सुरेखाताई काळे, नगरसेवक संध्याताई मापारी, गटनेते अक्षय काळे, बबलू हाजी, मातंग एकता आंदोलन जिल्हाध्यक्ष तथा सिल्लोड शिवसेना नेते संदीप मानकर, सुनिल बनसोडे, प्रवीण बनसोडे, सुधाकर बनसोडे, राहुल अंभोरे, सरपंच पंजाबराव कुनगर ,ग्रा.पं. सदस्य रवींद्र जगताप, मधुकर इंगळे, फिरोझ पठाण, दिपाली औरंगे, सखुबाई इंगळे, तंटामुक्ती अध्यक्ष भगवान तायडे, उपाध्यक्ष सुरेश पाटील, पोलीस पाटील मिलिंद सोनवणे, श्रीराम पाटील, दत्तु दादा इंगळे , जीवन पाटील, भरत इंगळे, आनंदा इंगळे, ग्रामसेवक पुल्लेवाड, माजी सभापती संजय आगे,अरुण वाघ, अनिल इंगळे, संतोष सोनवणे, मोहम्मद पटेल, अन्वर पठाण, वनरक्षक नागरगोजे, वनपाल नागरे, वायरमन झोंड,पत्रकार ईश्वर इंगळे, विजय पगारे, सुनिल सैदाने, रुपचंद सरोदे, राहुल इंगळे, संजय इंगळे, रवी घन, भारत तायडे, आमखेडा सरपंच अनिता महाले ताई, पगारे ताई, शिल्पाताई बोर्ड, सोनाली मोरे, मायाबाई जगताप, कोकिळाबाई इंगळे, गिरजाबाई औरंगे, यशोदाबाई सैदाने, आशाबाई इंगळे आदींसहित गावकरी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्वांनी सुशिला इंगळे यांना शुभेच्छा दिल्या व त्यांच्या या आदर्श उपक्रमाचे कौतुक केले.

# दिवाळीच्या तोंडावर सुका मेवा महागला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दीपावलीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. दोन वर्षांपूर्वी ठप्प झालेली सुक्या मेव्याची मागणी आता वाढत असून एन दिवाळी सणात सुक मेवा महागला आहे. खारीक आणि पिस्ता प्रतिकिलो १०० रुपयांनी महागला असून मनुका ही वधारला आहे. दिवाळीसणात घरोघरी तयार केल्या जाणाऱ्या तसेच रेडीमेड फराळामध्ये तसेच बाजारातील मिठाईमध्ये प्रामुख्याने काजू, बदाम, पिस्ता, किसमिस आणि खारकेचा वापर केला जातो अनेक जण हा सुका मेवा आपल्या आप्तेष्टांना तर शासकीय , खासगी कंपन्या आपल्या कर्मचारी वर्गाला भेट म्हणून देतात. परंतु करोनाच्या दोन वर्षाच्या कालावधीत सुका मेवा भेटवस्तू देण्यात आलेली नाही. मात्र दिवाळीच्या अनुषंगाने सुका मेवा मागणी वाढली आहे त्यामुळे दर वाढ झाली असल्याचे मत व्यापारी हर्षद देढिया यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे यंदा सुका मेवा खरेदी करताना ग्राहकांच्या खिशाला कात्री बसणार असून गृहिणींना ही हात आखडता घ्यावा लागणार आहे.





**श्रीमती. लता मारोती जाधव यांचा TC माळी चौक ते योगेश्वरी देवी मंदिर रोडवरती गहाळ झालेला असुन तो जर कुणाला सापडला असेल तर कृपया तो एकतर संबंधित पोलिस स्टेशन अथवा मला या मो.7775827019 नंबर वरती संपर्क करावा ही कळकळीची नम्र विनंती.**

# 'गोंडर' कादंबरीच्या स्वरूपात लेखक अशोक कुबडे यांनी दिले दसऱ्याचे सोने



आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** अथक परिश्रम, जिद्द आणि कल्पकता यांच्या जोरावर अनेक वर्षांपासून लेखक अशोक कुबडे हे कवी-कवयित्रींसाठी 'कविकट्टा' हा व्हाट्सअप समूह चालवीत आहेत. जगातील अनेक देशातील कवी-कवयित्रींना यामुळे व्यासपीठ मिळाले आहे! अशोक कुबडे यांना बाराबलुतेदारीतून आलेले दाहक अनुभव 'गोंडर' या कादंबरीतून त्यांनी प्रखरतेने मांडले आहेत. नव्या आणि जुन्या पिढीतील सर्वांच्याच जवळ असली पाहिजे अशी ही त्यांची कादंबरी आहे. 'सामाजिक सोने' किंवा 'सोन्याचा दस्तऐवज' आम्ही लेखक अशोक कुबडे यांच्या घरी जाऊन शाल, पुष्पगुच्छ, पेढे व मानधनाचा धनादेश देऊन त्यांच्या सुपूर्द केला. 'गोंडर' या कादंबरी ही दसऱ्याचे हे सोने आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मोलखेडा ते हिवरी या रस्त्याची दयनीय अवस्था !

## खड्ड्यांचे गाव म्हणून बारा खेड्यात मोलखेडा व हिवरी 'या' गावाची नवी ओळख !

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** रस्ते विकासाचे प्रतीक आहे. रस्त्यांवरूनच विकासाची संकल्पना ठरविली जाते. एकीकडे स्मार्ट सिटी बुलेट ट्रेनचे स्वप्न बघणाऱ्या देशात ग्रामीण भागात नागरिकांना जायला धड रस्ता नाही. नागरिकांना कोसो दूर तारेवरची कसरत करत वाहने चालवावी लागतात. सोयगाव तालुक्यातील सर्व ठिकाणी रस्त्याचे तीन-तेरा वाजल्याने तालुक्याच्या विकासाला खीळ बसत असून त्यामुळे अपघाताच्या प्रमाणात देखील वाढ होत आहे.

मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्तग्रामीण भागातील रस्त्यांचे भाग्य उजळणार कधी हाय जनतेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून अनुत्तरीत आहे. रस्ते आणि विकास हे दोन्ही शब्द अगदी जवळचे आहेत, मात्र हे दोन्ही शब्द एकमेकांपासून कोसो दूर गेल्याचे चित्र ग्रामीण भागात आहे. ग्रामीण



भागात मोठ्या प्रमाणात रस्त्याची दुरावस्था झाली असून गावात जायला धड रस्ता नसल्याचे दिसून येते. सोयगाव तालुक्यातील मोलखेडा आणि हिवरी गावच्या शाळेतील विद्यार्थी आणि गावातील शेतकरी ग्रामस्थ यांचं आरोग्य धोक्यात. मालखेडा व हिवरी या ग्रामीण भागातील रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत, या रस्त्यावरून वाहने चालविताना नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. यातील अनेक मार्ग तर खड्ड्यांचे मार्ग म्हणून ओळखले जातात या हिवरि या रस्त्यात एवढे खड्डे पडले आहेत त्यावरून प्रवास करणे नागरिकांच्या नाकीनऊ येत आहेत. मोलखेडा आणि हिवरी हे ठिकाण आहे, त्यामुळे विद्यार्थी, कर्मचाऱ्यांना कामासाठी या मार्गावरून रात्री-अपरात्री प्रवास करावा लागतो, मात्र या मार्गावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिकांना एक दोन तास अगोदर घरातून बाहेर पडावे लागते.

यागावांतील नागरिक खड्ड्यांमुळे त्रस्त झाले आहेत, महत्त्वाचे म्हणजे वेळोवेळी समस्या मांडूनही देखील मोलखेडा ते हिवरी हे रस्ते दुरुस्त होत नसल्याने परिसरातील नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने मागील महिन्यात या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात झाल्याच्या घटना घडल्या होत्या.

यावरुन या मोलखेडा आणि हिवरी या गावात किती मोठ्या प्रमाणात खड्डे असतील याचा सहज अंदाज बाधता येतो. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मोलखेडा ते हिवरी या सर्वच भागातील रस्त्यांची एवढी मोठी दुरवस्था झाली आहे की, हे खड्डे नागरिकांच्या जिवाला कारणीभूत ठरत आहेत. याबाबत तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी व शासनाने लक्ष देऊन या रस्त्याची डागडुजी करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे काम रखडले

## भाजपा आमदार पडळकरांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भायखळ येथे लोकशाहीर अण्णा



भाऊ साठे यांच्या नावे असलेले नाट्यगृह बंद आहे. यावरून भाजपा आमदार गोपीचंद पडळकरांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पत्र लिहले आहे. नाटगृहाच्या उद्घाटनाचे काम १७ महिन्यांपासून रेंगाळलेले असून, ते आपण दिवाळीच्या अगोदर मार्गी लावावे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंच्या नावाचे नाट्यगृह लोककलाकार रसिक मायबाप प्रेक्षकांसाठी सुरू करावे, अशी मागणी पडळकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. गोपीचंद पडळकरांनी मुख्यमंत्री शिंदेंना लिहलेल्या पत्रात म्हटले की, "मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा एक प्रखर आवाज, वंचित बहुजनांच्या वेदनेला आपल्या साहित्य, पोवाडे, लावण्यांमधून जागतिक पातळीवर पोहचवणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होते. त्यांच्या स्मृतींमधून आजही आपणाला प्रेरणा मिळते. परंतु, गेल्या तब्बल ३८ वर्षांपासून लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंच्या नावाने भायखळा येथे असलेले नाट्यगृह बंद पडले आहे. त्या नाट्यगृहाची दुरावस्था झाल्यामुळे महाराष्ट्रातील तमाम लोककलाकारांचा आणि अण्णा भाऊ साठेंच्या कर्तृत्वाचा अपमानच होतोय. ही मोठी शोकांतिका आहे. अण्णा भाऊंच्या नावाने हे नाट्यगृह सुरु करण्यात आले होते. मात्र, गेली ३८ वर्षे या सभागृहावर पडदा पडला आहे. १९६३ पासून लावणी, भारुड इत्यादी लोककलांच्या सादरीकरणासाठी या खुल्या रंगमंचाचा वापर केला जात होता. ४५० प्रेक्षकांसाठी हे खुले नाट्यगृह महापालिकेने सुरु केले होते. पण, १९८४ ला हे नाट्यगृह बंद करण्यात आले. २००३ पर्यंत पडीक असणाऱ्या सभागृहाच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव चर्चेत आला. त्यावेळी १३ कोटींचा खर्च अपेक्षित होता. परंतु, तत्कालीन आघाडी सरकारने निधी देण्यास नकार दिल्यामुळे हे सभागृहाचे काम रखडले, असा निशाणा पडळकर यांनी तत्कालीन सरकारवर साधला आहे.

२०१४ ला तत्कालीन मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने प्रस्ताव तयार केला. त्यानंतर ७५० आसन क्षमतेचे सभागृह उभे राहिले. २०२१ पासून १७ महिने उलटले तरी हे सभागृह उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. आता बहुजन हिताचा विचार करणारे कार्यक्षम सरकार सत्तेवर आहे. नुकतेच देवेंद्र फडणवीसांच्या प्रयत्नांमुळे रशियामध्ये अण्णा भाऊ साठेंच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. परंतु, मुंबई येथील सभागृह उद्घाटनाचे काम १७ महिन्यांपासून रेंगाळलेले आहे ते आपण दिवाळीच्या अगोदर मार्गी लावावे.

तसेच, लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंच्या नावाचे नाट्यगृह लोककलाकार रसिक मायबाप प्रेक्षकांसाठी सुरू करावे. हाच खरा लोकशाहीर अण्णा भाऊंच्या साहित्य साधनेचा गौरव असेल, असेही गोपीचंद पडळकर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

# गोरगरीब, खेड्यातील मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा भाजपाचा डाव : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील १४ हजार शाळा कमी पटसंख्येच्या नावाखाली बंद करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे समजते. कमी पटसंख्येच्या शाळा या दुर्गम, अतिदुर्गम, ग्रामीण भाग, आदिवासी पाडे या भागात आहेत. जिल्हा परिषदांच्या शाळांमधून शेतकरी, कष्टकरी, गरिब व सामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेत असतात. गाव-खेड्यातील या शाळा बंद केल्या तर ही मुले शिक्षणापासून वंचित राहतील त्यामुळे शाळा बंद करण्याची कार्यवाही तात्काळ थांबवावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात नाना पटोले यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र हे शैक्षणिकदृष्ट्या अग्रेसर व प्रगत राज्य म्हणून देशात ओळखले जाते. विविध नामवंत शिक्षण संस्थांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शिक्षण हा पुढील शिक्षणाचा पाया आहे असे असताना आपले सरकार मात्र मुलांना प्राथमिक शिक्षणापासूनच वंचित करत आहेत.

संसदेत २००९ मध्ये शिक्षणाचा अधिकार कायदा पारित करण्यात आला आहे. या कायद्याने ६ ते १४ वर्षांच्या प्रत्येक बालकास जवळच्या शाळेत प्रवेशासोबत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद आहे. या वयोगटातील बालकांना शिक्षण मिळण्याची खात्री करण्यासाठी राज्य सरकार बांधील आहे. खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी २५% आरक्षणही या तरतूदीकरिता लागू आहे. महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या शून्य ते २० पर्यंत असलेल्या शाळा बंद करण्याचा घाट घातला आहे. यामुळे आदिवासी पाडे आणि दुर्गम भागातील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होत आहे. शाळा बंद केल्या तर या भागातील मुलांनी शिक्षणासाठी कुठे जायचे ? गावापासून दूर अंतरावरील शाळांमध्ये जाऊन शिक्षण घेणे लहान मुलांना किती अडचणीचे ठरू शकते याचा विचार करायला हवा. शाळा बंद करण्याचा जो घाट घातला जात आहे त्याला सर्व स्तरातून विरोध आहे. सामान्य जनतेवर अन्याय करणाऱ्या अशा निर्णयास काँग्रेस पक्षाचाही विरोध आहे. राज्यातील ग्रामीण भागातील गरिब, कष्टकरी जनतेच्या मुलांना शाळेपासून वंचित ठेवण्याचे पाप आपण करु नये. महाराष्ट्राला मोठी शैक्षणिक परंपरा लाभलेली आहे. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासह अनेक समाजसुधारकांनी शिक्षणाची दारे बहुजन समाजाला उघडी केली. काँग्रेस सरकारने शिक्षणाचा प्रचार व प्रसार करून गाव खेड्यापर्यंत शिक्षणाची गंगोत्री पोहचवली. याउलट गुजरातमधील भाजपा सरकारने ६ हजार शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे आणि महाराष्ट्रात १४ हजार शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे. गोरगरिबांना शिक्षण मिळू नये हे भाजपाचे धोरण आहे, हजारो वर्षापासून समाजातील मोठ्या घटकाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न गेले केले. आज भारतीय जनता पक्ष त्याच वाटेने जात आहे ही मनुवादीवृत्ती असून बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा हा घाट आम्ही हाणून पाडू, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# सरकारचा निर्णय शेतकऱ्यांना दिलासा देणारा : बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अति उच्चदाब पारेषण वीज वाहिन्यांच्या मनोऱ्यांसाठी जमिनीचा मोबदला देण्याकरिता सुधारित धोरणास बुधवारी मान्यता दिल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून या निर्णयाबद्दल आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली. ते म्हणाले की, वीज वाहिनी व मनोरे उभारण्याच्या सध्याच्या धोरणात बाधित शेतकरी आणि जमीन मालकांना मिळणारी नुकसान भरपाई तुटपुंजी असल्याने त्यांचा विरोध होत होता. नव्या धोरणामुळे शेतकऱ्यांना व जमीन मालकांना दिलासा मिळाला आहे. यामुळे मनोरा आणि वाहिनी उभारणी वेगाने होऊन वीज पुरवठ्यास मदत होईल. त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोककल्याणकारी योजनांमुळे राज्यातील सामान्य लोकांना थेट लाभ झाला आहे. तथापि, महाविकास आघाडी सरकारच्या काळात गेल्या अडीच वर्षांत या योजनांच्या अंमलबजावणीत राज्यात



अडथळे येत होते. त्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत फ्लॅगशिप योजनांना अधिक गती देण्याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बुधवारचा आदेश स्वागतार्ह आहे. यामुळे प्रधानमंत्री ग्रामसडक, प्रधानमंत्री आवास शहरी योजना, प्रधानमंत्री आवास ग्रामीण योजना, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री किसान सन्मान, स्वामीत्व- ड्रोनद्वारे गावांचे सर्वेक्षण, मृद आरोग्य पत्रिका (सॉईल हेल्थ कार्ड), किसान क्रेडिट कार्ड, अटल पेन्शन योजना, स्वनिधी योजना त्याचप्रमाणे आयुष्मान भारत जनआरोग्य योजना यासह विविध योजनांच्या राज्यातील अंमलबजावणीला गती मिळेल, असा विश्वास वाटतो. माणगाव, रामटेक, इगतपुरी, बेलापूर, कर्जत, वाई, येवला, परांडा येथे न्यायालये स्थापन करून पदनिर्मिती करण्याचा निर्णय आजचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय राज्याच्या विविध विभागातील जनतेला दिलासा देणारा आहे, असेही ते म्हणाले.

# देशात ४५ लाख पोती हळद शिल्लक; हळदीच्या दरात घसरण



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** हळदीच्या उत्पादनात झालेली मोठी वाढ, हळद पावडर वापर होणाऱ्या पूरक उद्योगात आलेली मंदी आणि उत्पादनाच्या तुलनेत निर्यातीत वाढ न होणे आदी कारणांमुळे हळदीच्या दरात प्रति क्विंटलला ५०० ते १००० रुपयांनी दरात घट झाली आहे. सध्या देशात ४५ लाख पोती (एक पोते ५० किलोचे) शिल्लक आहेत. भविष्यात हळदीच्या दरात फारशी तेजी येण्याची शक्यता नसल्याचा अंदाज जाणकांरनी व्यक्त केला आहे.

यंदा मराठवाड्यातील विक्रमी लागवडीसह देशात हळदीची सुमारे २ लाख ४४ हेक्टरवर लागवड झाली होती; पण पाऊस जास्त झाल्यामुळे उत्पादनात घट होऊन सरासरी ८० लाख पोती उत्पादन झाले होते. दोन वर्षांपासून देशात हळदीच्या उत्पादनात वाढ होत आहे. शिवाय दरवर्षी देशभरात सुमारे २५ लाख पोती शिल्लक असतात. त्यामुळे बाजारात १ कोटी १० लाख पोती विक्रीसाठी उपलब्ध असतात. यंदा देशांतर्गत पूरक उद्योगात मंदीचे वातावरण आहे. त्यामुळे हळदीचा वापर कमी झाला आहे. सध्या देशात ४५ लाख पोती शिल्लक आहेत. यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीला हळदीच्या दरात ५०० ते ८०० रुपयांनी तेजी होती. मार्च ते मे या तीन महिन्यांत प्रामुख्याने हळद विक्रीचा कालावधी असतो. या दरम्यान हळदीचे दर चांगले होते. जून महिन्यात देखील हळदीचे दर टिकून होते; पण आता काही प्रमाणात मंदी आहे. देशात दररोज चार ते पाच लाख पोती हळदीची विक्री होत असली, तरी बाजारात हळदीचा फारसा उठाव नाही. दिवाळी झाल्यानंतर हळदीच्या विक्रीत वाढ होईल, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. ऑक्टोबर ते जानेवारी या चार महिन्यांत २० ते २५ लाख पोत्यांची विक्री होण्याची शक्यता आहे. तरीही यंदाच्या हंगामात सुमारे २० ते २५ लाख पोती हळद शिल्लक राहतील. या दरम्यान हळदीच्या दरात तेजी-मंदी होण्याची शक्यताही नाही. दर स्थिर राहतील, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. देशात हळदीची लागवड २ लाख ७५ हजार हेक्टरवर झाली होती. गेल्या काही वर्षांत हवामानात वेगाने बदल होत आहे. अति पाऊस, दुष्काळ आणि उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कोणत्या भागात हळदीच्या पिकाचे नुकसान झाले, कोणत्या भागात पीक चांगले आहे, याचा अंदाज लावणे कठीण झाले आहे. डिसेंबर-जानेवारीच्या दरम्यान देशातील हळदीचे क्षेत्र आणि पिकाची परिस्थिती समोर येईल. त्या वेळी उत्पादन घटेल की वाढेल, याचा अंदाज लावणे शक्य आहे. हळदीचा वापर होणाऱ्या पूरक उद्योगात मंदीचे वातावरण आल्याने हळदीच्या खरेदी-विक्रीवर परिणाम झाला आहे. तसेच देशात हळदीच्या क्षेत्रात वाढ होत आहे. याचा परिणाम दरावर होत आहे. गेल्या वर्षीपेक्षा यंदा हळदीच्या निर्यातीत वाढ झाली असल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे.

# जरंडी येथे ६३ किलो गांजाची नऊ फूट उंचीची झाडे जप्त

## सपोनि अनमोल केदार यांची धडाकेबाज कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील जरंडी शिवारात कपाशी व तूर पिकामध्ये लागवड केलेली गांजाची झाडे दिनांक १२/१०/२०२२ बुधवार रोजी सपोनि अनमोल विनायक केदार यांना त्यांचे गुप्त बातमीदाराने दिलेल्या गुप्त माहितीवरून सोयगाव पोलिसांनी जरंडी शिवारात जाऊन शेतात तुरळक ठिकाणी ही झाडे असल्याने पोलिसांना ते शोधण्यासाठी तीन तास लागले.सपोनि अनमोल विनायक केदार यांनी मा, वरीष्ठांना हि माहिती दिली असता मा. वरिष्ठांनी दिलेले आदेश, मार्गदर्शन व दिलेल्या सूचनानुसार सहा.सपोनि अनमोल विनायक केदार यांनी छापा टाकून कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले आहे.जरंडी शिवारातील शेत गट नं. २९ मध्ये छापाची कारवाई केली असता सुभाष महादु महाजन यथ ४८ याने स्वतःच्या शेतात विना परवाना बेकायदेशीर रित्या चोरटी विक्री करण्याचे हेतुने प्रतिबंधीत असलेल्या गांजा वनस्पतीची लागवड करून व बाळगुन ६३ किलो १९० ग्रॅम वजनाची एकूण किमत ३,१५,१५०/- रुपये किमतीचा एन.डी.पी.एस गुन्हयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला आहे. नऊ फूट उंच वाढलेली गांजाची झाडे सोयगाव पोलिसांनी सुभाष महाजन यांच्या शेतात जप्त केलेल्या गांजाची झाडे ही नऊ उंच वाढलेली आढळली असता या परिपक्व झाडांना पिवळसर बोंडे लागली होती.दरम्यान घटनास्थळी यावेळी सोयगाव कृषी विभाग पथकाचे कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर, विश्‍ववजीत तायडे, महसूल विभागाचे कर्मचारी अधिकाऱ्यांसह सोयगाव पोलिसांनी यावेळी पंचनामा केला. आरोपी सुभाष महाजन याच्याविरुद्ध कलम २०(अ), (१) अमली औषधी द्रव्य व मन प्रभावी पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस) प्रमाणे कायदेशीर कारवाई करून पोलीस स्टेशन सोयगाव येथे गुन्हा १९९ / २०२२ दाखल करण्यात आला असून गांजाची झाडे व आरोपीला ताब्यात घेतले आहे.गुन्हयाचा पुढील तपास उपनिरीक्षक सतीश पंडित याच्यांकडे दिले आहे. नमुद गुन्हयातील आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री मनीष कलवानिया, औरंगाबाद ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री पवन बन्सोड, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विजय मराठे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि अनमोल केदार,उपनिरीक्षक सतीश पंडित,पोलीस कर्मचारी राजु बरडे, ज्ञानेश्वर सरताळे,अजय कोळी,रवींद्र तायडे, गणेश रोकडे, नारायण खोडे यांनी केलेली आहे.



# फर्दापूर तंटामुक्ती अध्यक्षपदी शेख मुक्तार यांची फेरनिवड



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील शेख मुक्तार शेख मुन्शी यांची ग्रामपंचायत कार्यालयातील प्रांगणात गावातील लोकप्रतिनिधी नागरिक यांनी तंटामुक्तीच्या अध्यक्षपदी पुन्हा फेरनिवड शेख मुक्तार यांच्याच नावाला सर्वाधिक पसंती दिली. जिल्हा मध्यवर्ती बँकमध्ये पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी शाखा व्यवस्थापक भगूरे, कॅशियर प्रकाश पाटील, साईदास पवार, शिवसेना युवा अध्यक्ष, इम्रान शहा, अजहर शेख, सय्यद शकील, पत्रकार प्रविण तायडे,उपस्थित होते. 2018 मध्ये शेख मुक्तार त्यांच्या गळयात सर्वप्रथम तंटामुक्ती अध्यक्षपदाची माळ पडली 2018 -2022 पर्यन्त गोरगरीब जनतेचे प्रश्न, असो समस्या असो पोलिस स्टेशनपर्यंत प्रकरण न जाऊ देता समज देऊन व मार्ग काढून प्रकरणे मार्गी लावले रात्री अपरात्री ते प्रकरणे मार्गी लावण्यासाठी सदैव तत्परता दाखवली सर्व धर्म समभाव, व एक घट्ट नाळ रुजवून लोकांच्या मनात एक आपुलकीचे नाते रुजवले त्याचेच फळ म्हणून परत फेर निवड म्हणून शेख मुक्तार शेख मुन्शी यांची तंटामुक्ती च्या अध्यक्षपदी पुन्हा फेरनिवड करण्यात आली त्यांच्या फेरनियुक्तीचे सर्वच नागरिकांनी अभिनंदन केले.

# मोसंबी पिकाविषयी चर्चासत्राचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील मोसंबी उत्पादकाच्या मोसंबी जतन करण्यासाठी विशेष तांत्रिक चर्चासत्राचे आयोजन तालुका कृषी विभाग व संचालक कृषी जगत यांच्या वतीने आयोजित करण्यात आल्याची माहिती कृषी जगत चे संचालक रामेश्वर सुसे यांनी दिली आहे.

तालुक्यातील मोसंबी उत्पादकांसाठी मोसंबी फळबाग विषयी तांत्रिक स्वरूपाची माहिती मेळावा यासाठी तालुका कृषी विभाग व संचालक कृषी जगत यांच्या वतीने दि.१६ रोजी रविवारी सकाळी अकरा वाजता तांत्रिक चर्चासत्राचे आयोजन पैठण शेवगाव रोड लगतच्या चांगतपुरी फाटा येथील प्रगतिशील शेतकरी अमरसिंह वावरे यांच्या शेतात मोसंबी फळबाग पाहणी व चर्चासत्र कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून. यावेळी मोसंबी फळबाग समस्या व सदरील चर्चासत्रामध्ये वातावरणातील बदलामुळे मोसंबी या फळ पिकावर होणारे परिणाम, मोसंबी या फळावर येणारा काळा डाग म्हणजेच मंगू, मोसंबी फळावर तसेच पानांवर येणारे स्केल व कोळशीचा प्रादुर्भाव, मोसंबी चा बहार धरण्यापूर्वी घ्यावयाची काळजी, मोसंबी या फळाची फुलधारणेपासून ते झाडावरील फळ उतरेपर्यंत या सर्व कालावधीत वेगवेगळ्या स्तरांमध्ये होणारी फळगळ, तसेच इतर अनेक मोसंबी पिका विषयक सविस्तर माहिती व शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी या सर्वांचे खुले चर्चासत्र व मार्गदर्शन कृषी शिक्षण व संशोधन पुणे संचालक डॉ हरिहर कौसडीकर, जिल्हा फळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ एम.बी पाटील, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ, पंचायत समिती कृषी अधिकारी विकास पाटील इत्यादी मान्यवर तज्ञ यावेळी मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहे. मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कृषी जगत फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.



# वनाधिकाऱ्यांच्या ताब्यातील संशयित फरार

आधुनिक केसरी न्यूज

**यावल :** पूर्व वनक्षेत्रात अतिक्रमण करीत मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करून वनसंपत्ती नष्ट करण्याच्या प्रकरणात अटक केलेले तीन संशयित बुधवारी रात्री यावल पूर्व वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ताब्यातून फरार झाल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात यावल वनविभागाचे उपवनसंरक्षक विवेक होसिंग, सहाय्यक वनसंरक्षक हडपे हे संबंधितांवर काय कारवाई करतात, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. यावल तालुक्यातील सातपुडा पर्वतातील वनविभागाच्या पूर्व पेझरपाळा या कम्पाडमेंट (कक्ष क्रमांक ७९ व ८०)मधील वनक्षेत्रात अवैधरीत्या मौल्यवान वृक्षांची तोड करीत असल्याच्या कारणांवरून वनविभागातर्फे वनाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील संशयित प्यारासिंग पावरा, सुरेश पावरा, बिलालसिंग यांना बुधवारी भुसावळ येथील न्यायालयात हजर करून पुन्हा यावल येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले. यावल येथील पोलीस कोठडीत ठेवण्याची अटकेची प्रक्रिया करीत असताना रात्री आठच्या सुमारास तिन्ही संशयित फरार झाले. याबाबतची माहिती घेण्यासाठी यावल पूर्व वनक्षेत्रपाल विक्रम पदमोर यांच्याशी गुरुवारी सकाळी भ्रमणध्वनीवरून चार-पाच वेळा संपर्क साधला. मात्र, तो होऊ शकला नाही. फरार संशयितांच्या शोधकामी वेगवेगळी पथके सातपुडा पर्वताच्या अतिदुर्गम क्षेत्रात रात्रीच पाठविण्यात आल्याचेही सहाय्यक वनसंरक्षक हडपे यांनी सांगितले.

# प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलामुळे नावलौकिकात भर : मुख्यमंत्री शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या माध्यमातून अनेक होतकरू तरुण क्रीडापटू घडत आहेत ही आनंदाची व अभिमानस्पद बाब आहे त्यामुळे राज्याच्या नाव लौकिकात भर पडत आहे असे उद्गार मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी काढले ते मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे बोलत होते या वेळी संकुलातील पदक विजेत्या यशस्वी खेळाडू आणि प्रशिक्षक यांचा प्रामुख्याने गौरव करण्यात आला. यावेळी आमदार पराग अळवणी, प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद प्रभू, सचिव डॉ मोहन राणे, लीना प्रभू, राजू रावळ मकरंद येडुरकर तसेच संकुलाचे पदाधिकाऱ्यांसह, प्रशिक्षक, क्रीडापटू उपस्थित होते. प्रारंभी डॉ. रमेश प्रभू यांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, डॉ. रमेश प्रभू हे लोकप्रिय लोकप्रतिनिधी होते. त्यांनी नागरिकांच्या समस्या सोडविण्यासोबतच या क्रीडा संकुलाची उभारणी केली. या क्रीडा संकुलामधून अनेक होतकरू खेळाडू निर्माण झाले. ज्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचा व राज्याचा नावलौकिक वाढविला. क्रीडा संकुलातून असे महान खेळाडू तयार होत आहेत. या खेळाडूंना या संस्थेच्या माध्यमातून नेहमीच सहकार्य लाभले आहे. लीना प्रभू यांनी विमानतळ मेट्रो स्थानकास मुंबईचे माजी महापौर/माजी आमदार डॉ रमेश यशवंत प्रभू यांचे नाव देण्याची तसेच एखादा मुख्य रस्ता किंवा वैद्यकीय महाविद्यालय, उड्डाण पूल, मेट्रो स्थानकास डॉ पुषा रमेश प्रभू यांचे नाव देण्याची विनंती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले डॉ रमेश प्रभू यांचे मेट्रो स्थानकास नाव देण्याबाबत नक्की विचार करू तसेच या परिसरातील पुनर्वसन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असेल असे ही मत शिंदे यांनी या प्रसंगी व्यक्त केले. हा कार्यक्रम प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल विलेपार्ले येथे नुकताच पार पडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संकुलाच्या कर्मचारी वर्गाने फार मेहनत घेतली.

